# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका विशेष सभा

## कार्यपत्रिका क्रमांक -४५

## सभावृत्तांत

दिनांक :- २०.३.२०१० वेळ :- दुपारी १.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.महापालिका विशेष सभा शनिवार दिनांक २०.३.२०१० रोजी दुपारी १.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.बहल योगेश मंगलसेन महापौर
२. मा.आसवानी डब्बु उपमहापौर
३. मा.भालेकर शांताराम कोंडीबा
४. मा. घुले रघुनंदन रामभाऊ
५. मा.जाधव विजया अशोक (मामी)
६. मा.थोरात एकनाथ दादा
७. मा.दत्तात्रय बाबुराव साने
८. मा.सौ.अलकाताई बाळासाहेब यादव
९. मा.लोखंडे सुजाता सुनिल
१०. मा.बो-हाडे शरद परशुराम
११. मा.आल्हाट शांता महेंद्र
१२. मा.डॉ. सौ. मीना पाटील
१३. मा.खेडकर घनशाम रामचंद्र
१४. मा.कुंभार रामदास तानाजी

१५. मा.सौ.सारिकाताई संतोषभाऊ लांडगे

१६. मा.गवळी विजया पंडित

१७. मा.अजित दामोदर गव्हाणे

१८. मा.महेश किसन लांडगे

१९. मा.फुगे सुनंदाताई विजय

२०. मा.आशा अंकुश लांडगे

२१. मा.मोहिनी विलास लांडे

२२. मा.लोंढे संतोष ज्ञानेश्वर

२३. मा.सौ. वर्षा विलास मडीगेरी

२४. मा.सावळे सिमा

२५. मा.ननावरे जितेंद्र बाबासाहेब

२६. मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर

२७. मा.डॉ.वैशालीताई घोडेकर

२८. मा.राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले

२९. मा.भोसले हनुमंतराव भिमराव

३०. मा.यशवंत भोसले

३१. मा.कदम निर्मला सदगुरु

३२. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश

३३. मा. चौधरी अख्तरहुसेन तालुकदार

३४. मा.काळूराम मारुती पवार

३५. मा.आझम फकीरभाई पानसरे

३६. मा. चांदगुडे महेश गंगाराम

३७. मा.श्री.बाबर प्रकाश धरमसी

३८. मा.भापकर मारुती साहेबराव

३९. मा.शेट्टी जगदिश

४०. मा.सौ. मंगलाताई अशोक कदम

४१. मा.बोबडे भिमा सखाराम

४२. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

४३. मा.गवळी शशीकिरण

४४. मा.तानाजी विठ्ठल खाडे

४५. मा.उबाळे वैशाली संजय

४६. मा.सुमनताई मधुकर पवळे

४७. मा.कुमार आर. एस.

४८. मा.सौ. नंदा विकास ताकवणे

४९. मा.उल्हास शेट्टी

५०. मा.जावेद शेख

५१. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती

५२. मा.कुटे गोपाळ नाना

५३. मा.शरद उर्फ राजू मिसाळ

५४. मा.भोंडवे तुकाराम महादू

५५. मा.खानोलकर मनोज विक्रम

५६. मा.गणेश तुकाराम भोंडवे

५७. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव

५८. मा.वाघ रघुनाथ दलपत

५९. मा.सौ. आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी

६०. मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर

६१. मा.आण्णा दादू बनसोडे

६२. मा.तिकोने हरिभाऊ किसन

६३. मा.बाराहाते शरद भगवंतराव

६४. मा.अपर्णा निलेश डोके

६५. मा.गावडे जयश्री वसंत

६६. मा.साबळे जगन्नाथ दगडू

६७. मा.गुरुबक्ष किसनदास पहलानी

६८. मा.रामआधार धारिया

६९. मा. ॲड. अमर साधूराम मुलचंदानी

७०. मा.सौ.वाघेरे उषा संजोग

७१. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

७२. मा.विठ्ठल ऊर्फ नाना काटे

७३. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे

७४. मा.भाऊ उर्फ कैलास गबाजी थोपटे

७५. मा.तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब

७६. मा.भारती ज्योती सुखलाल

७७. मा.कोकणे संतोष अंकुश

७८. मा.सुतार विजया विजय

७९. मा.दरेकर सतीश दगडू

८०. मा.आण्णा ऊर्फ मनोहर पवार

८१. मा.बारणे संतोष नागु

८२. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब

८३. मा.बारणे श्रीरंग चंदु ऊर्फ आप्पा

८४. मा.कलाटे कमल तानाजी

८५. मा.आदियाल (शीख) शोभा गुरुमितसिंग

८६. मा.सौ. नांदगुडे सुजाता विलास

| | |
|---|---|
| ८७. | मा.खोमणे लता हनुमंत |
| ८८. | मा.प्रशांत शितोळे |
| ८९. | मा.ढोरे उषा ऊर्फ माई मनोहर |
| ९०. | मा.अशोकभाई सोनवणे |
| ९१. | मा.साळुंखे सुरेखा मारुती |
| ९२. | मा.सौ. जगताप कल्पना कैलास |
| ९३. | मा.जगताप शंकर पांडुरंग |
| ९४. | मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब |
| ९५. | मा.सौ. गावडे सुषमा गोविंद |
| ९६. | मा.गायकवाड सुरदास तुकाराम |
| ९७. | मा.काटे राजेंद्र भिकनशेठ |
| ९८. | मा.नितीन ऊर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ |
| ९९. | मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ |
| १००. | मा. हनुमंत बाळासाहेब गावडे |
| १०१. | मा. उत्तम मुक्ताजी हिरवे |
| १०२. | मा. विनायक सुरेश रणसुभे |
| १०३. | मा. प्रेमकुमार शंकरन नायर ऊर्फ बाबू नायर |
| १०४. | मा. एकनाथ रावसाहेब पवार |

याशिवाय मा.आशिष शर्मा-महापालिका आयुक्त, मा.डुंबरे-अति.आयुक्त, मा.देशमुख, मा.मुंढे, मा.गायकवाड, मा.फडणीस-सहा. आयुक्त, मा.काळे-नगरसचिव, मा.उगिले-शहर अभियंता, मा.सुरगूडे-विकास अभियंता, मा.चव्हाण-अति.शहर अभियंता, मा.लोंढे-मुख्य लेखापाल, मा.डॉ.कुणचगी-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,

मा.डॉ.अय्यर-वैद्य.संचालक, मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्य.)व मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------------------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

( किर्ती शिवराम दौंडकर, सौरभ संजीवकुमार वट्टमवार, स्नेहा कांबळे, मोनिका गोपिनाथ कुंभार, अस्मिता सावंत, कार्तिकी गायकवाड यांचा विशेष कार्याबद्यल सत्कार करण्यात आला.)

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब,जेष्ठ साहित्यिक-विं.दा.करंदीकर यांचे दु:खद निधन झालेले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहून सभा तहकुब करणेत यावी.

मा.काळूराम पवार :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

मा.सुलभा उबाळे :- मा.महापौर साहेब, शिवसेना नेते मधुकर सरपोतदार यांचे दु:खद निधन झालेले असल्याने त्यांना पण श्रध्दांजली वाहणेत यावी.

मा.ज्योती भारती :- अनुमोदन देते.

मा.अशोकभाई सोनवणे :- मा.महापौर साहेब, नानाजी देशमुख यांचे दु:खद निधन झालेले असल्याने त्यांना पण श्रध्दांजली वाहणेत यावी.

मा.मारुती भापकर :- अनुमोदन देतो.

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, नाना बाबुराव साने यांचे दु:खद निधन झालेले असल्याने त्यांना पण श्रध्दांजली वाहणेत यावी.

मा.उल्हास शेट्टी :- अनुमोदन देतो.

मा.महापौर :- सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

------------

मा.महापौर :- उपस्थित सन्मा.सदस्यांच्या भावना विचारात घेवुन त्यांच्या संमतीप्रमाणे शनिवार दि. २०.०३.२०१० रोजी दुपारी १.५० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(बहल योगेश मंगलसेन)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

मा.महापालिका विशेष सभा

कार्यपत्रिका क्रमांक -४५

सभावृत्तांत

( दि.२०.३.२०१० (दु.१.००) ची तहकूब सभा )

दिनांक :- २०.३.२०१० वेळ :- दुपारी १.५० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०.३.२०१० (दु. १.००) ची तहकूब मा.महापालिका विशेष सभा शनिवार दिनांक २०.३.२०१० रोजी दुपारी १.५० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बहल योगेश मंगलसेन महापौर
२. मा.आसवानी डब्बु उपमहापौर
३. मा.भालेकर शांताराम कोंडीबा
४. मा. घुले रघुनंदन रामभाऊ
५. मा.जाधव विजया अशोक (मामी)
६. मा.थोरात एकनाथ दादा
७. मा.दत्तात्रय बाबुराव साने
८. मा.सौ.अलकाताई बाळासाहेब यादव
९. मा.लोखंडे सुजाता सुनिल
१०. मा.बो-हाडे शरद परशुराम
११. मा.आल्हाट शांता महेंद्र
१२. मा.डॉ. सौ. मीना पाटील
१३. मा.खेडकर घनशाम रामचंद्र

१४. मा.कुंभार रामदास तानाजी

१५. मा.सौ.सारिकाताई संतोषभाऊ  लांडगे

१६. मा.गवळी विजया पंडित

१७. मा.अजित दामोदर गव्हाणे

१८. मा.महेश किसन लांडगे

१९. मा.फुगे  सुनंदाताई विजय

२०. मा.आशा अंकुश  लांडगे

२१. मा.मोहिनी विलास लांडे

२२. मा.लोंढे संतोष ज्ञानेश्वर

२३. मा.सौ. वर्षा विलास मडीगेरी

२४. मा.सावळे सिमा

२५. मा.ननावरे जितेंद्र बाबासाहेब

२६. मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर

२७. मा.डॉ.वैशालीताई  घोडेकर

२८. मा.राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले

२९. मा.भोसले हनुमंतराव भिमराव

३०. मा.यशवंत भोसले

३१. मा.कदम निर्मला सदगुरु

३२. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश

३३. मा. चौधरी अख्तरहुसेन तालुकदार

३४. मा.काळूराम मारुती पवार

३५. मा.आझम फकीरभाई पानसरे

३६. मा. चांदगुडे महेश गंगाराम

३७. मा.श्री.बाबर प्रकाश धरमसी

३८. मा.भापकर मारुती साहेबराव

३९. मा.शेट्टी जगदिश

४०. मा.सौ. मंगलाताई अशोक कदम

४१. मा.बोबडे  भिमा  सखाराम

४२. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

४३. मा.गवळी शशीकिरण

४४. मा.तानाजी विठ्ठल खाडे

४५. मा.उबाळे  वैशाली  संजय

४६. मा.सुमनताई  मधुकर पवळे

४७. मा.कुमार आर. एस.

४८. मा.सौ. नंदा विकास ताकवणे

४९. मा.उल्हास शेट्टी

५०. मा.जावेद शेख

५१. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती

५२. मा.कुटे गोपाळ नाना

५३. मा.शरद उर्फ राजू मिसाळ

५४. मा.भोंडवे तुकाराम महादू

५५. मा.खानोलकर मनोज विक्रम

५६. मा.गणेश तुकाराम भोंडवे

५७. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव

५८. मा.वाघ रघुनाथ दलपत

५९. मा.सौ. आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी

६०. मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर

६१. मा.आण्णा दादू बनसोडे

६२. मा.तिकोने हरिभाऊ किसन

६३. मा.बाराहाते शरद भगवंतराव

६४. मा.अपर्णा निलेश डोके

६५. मा.गावडे  जयश्री वसंत

६६. मा.साबळे  जगन्नाथ दगडू

६७. मा.गुरुबक्ष किसनदास पहलानी

६८. मा.रामआधार धारिया

६९. मा. ॲड. अमर साधूराम मुलचंदानी

७०. मा.सौ.वाघेरे उषा संजोग

७१. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

७२. मा.विठ्ठल ऊर्फ नाना काटे

७३. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे

७४. मा.भाऊ  उर्फ  कैलास गबाजी थोपटे

७५. मा.तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब

७६. मा.भारती ज्योती सुखलाल

७७. मा.कोकणे संतोष अंकुश

७८. मा.सुतार विजया विजय

७९. मा.दरेकर सतीश दगडू

८०. मा.आण्णा ऊर्फ मनोहर पवार

८१. मा.बारणे संतोष नागु

८२. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब

८३. मा.बारणे श्रीरंग चंदु ऊर्फ आप्पा

८४. मा.कलाटे कमल तानाजी

८५. मा.आदियाल (शीख) शोभा गुरुमितसिंग

८६. मा.सौ. नांदगुडे सुजाता विलास

८७. मा.खोमणे लता हनुमंत

८८. मा.प्रशांत शितोळे

८९. मा.ढोरे उषा ऊर्फ माई मनोहर

९०. मा.अशोकभाई सोनवणे

९१. मा.साळुंखे सुरेखा मारुती

९२. मा.सौ. जगताप कल्पना कैलास

९३. मा.जगताप शंकर पांडुरंग

९४. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब

९५. मा.सौ. गावडे सुषमा गोविंद

९६. मा.गायकवाड सुरदास तुकाराम

९७. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

९८. मा.नितीन ऊर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ

९९. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ

१००. मा. हनुमंत बाळासाहेब गावडे

१०१. मा. उत्तम मुक्ताजी हिरवे

१०२. मा. विनायक सुरेश रणसुभे

१०३. मा. प्रेमकुमार शंकरन नायर ऊर्फ बाबू नायर

१०४. मा. एकनाथ रावसाहेब पवार

याशिवाय मा.आशिष शर्मा-महापालिका आयुक्त, मा.डुंबरे-अति.आयुक्त, मा.देशमुख, मा.मुंढे, मा.गायकवाड, मा.फडणीस-सहा. आयुक्त, मा.काळे-नगरसचिव, मा.उगिले-शहर अभियंता, मा.सुरगूडे-विकास अभियंता, मा.चव्हाण-अति.शहर अभियंता, मा.लोंढे-मुख्य लेखापाल, मा.डॉ.कुणचगी-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.अय्यर-वैद्य.संचालक, मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्य.)व मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------------------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, राज्य सरकारच्या वतीने घेणेत आलेल्या राज्यस्तरीय राजीवगांधी प्रशासकीय गतीमानता अभियान स्पर्धेत पिं.चिं.मनपास राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक मिळाला असल्याने मा.आयुक्त व मा.सहा.आयुक्त गायकवाड यांचे अभिनंदन करणेत यावे. तसेच मा.वंदना चव्हाण यांची विधान परिषद पोट निवडणूक-२०१० मध्ये आमदार पदी बिनविरोध निवड झालेली असल्याने त्यांचे अभिनंदन करणेत यावे.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

मा.महापौर :- राजीव गांधी प्रशासकीय गतीमानता अभियान-२००७-०८ या स्पर्धेत पिं.चिं.मनपास द्वितीय क्रमांक मिळालेला आहे. मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री यांचे हस्ते रोख बक्षीस तसेच प्रशस्तीपत्र व सन्मान चिन्ह देवून दि. १७.३.२०१० रोजी मुंबई येथे सत्कार करण्यात आलेला आहे त्याबद्यल आयुक्त-आशिष शर्मा व सहा.आयुक्त-साहेबराव गायकवाड यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, सभागृहामध्ये मी विषय मांडलेला होता की पिंपरी कॅम्पामधील अनअॅथोराईज बांधकामाला नोटिस दिलेली आहे ते पाडावे. त्यावेळेला माझे सहकारी मित्र आझमभाई पानसरे यांनी व सर्व पक्षानी सपोर्ट केला होता त्यांचे मी अभार मानतो. कारण त्यावर हायकोर्टाने आदेश दिलेले आहेत की ते बांधकाम पडावे व त्या मालकानी सुध्दा स्वत:हून दुकान पाडलेले आहे सर्वांनी मला मदत केली म्हणून सर्वांचे आभार मानतो.

मा.नगरसचिव :- विषय क्रमांक १- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीने तयार केलेले सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रक अ व क तसेच जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत महापालिकेने नमुद केलेल्या प्रशासकीय सुधारणांचा विचार करून शहरी गरीबांसाठीचे “प” अंदाजपत्रक त्याचप्रमाणे जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत प्रकल्पांसाठी प्राप्त शासन अनुदान व मनपा हिस्सा याबाबतचे अंदाजपत्रक विचारासाठी.

[मा.प्रशांत शितोळे,सभापती स्थायी समिती यांनी अंदाजपत्रकासंबंधीचे निवेदन सादर केले.]

मा.अशोकभाई सोनवणे :- मा.महापौर साहेब, स्थायी समितीने सन २०१०-११ चे बजेट सादर केलेले आहे. स्थायी समितीमध्ये मी सुध्दा होतो. स्थायी समितीमध्ये जेव्हा हे बजेट आले त्यावेळेला आयुक्तांना सुचविले होते की उपसूचना मांडावयास परवानगी द्यावी कारण प्रत्येकाला वाटत असते की आपल्या वॉर्डातील प्रत्येक काम प्राधान्याने करावे. महापालिकेनी तरतूद उपलब्ध करुन द्यावी असे प्रत्येक सभासदास अपेक्षीत असते. बजेट आयुक्तांनी बनविले ते आहे तसे सादर केले त्यावेळेला सूचना केली होती प्रत्येक वॉर्डासाठी सव्वाकोटीचा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे त्यातून प्राधान्याने एखादया योजनेसाठी कमी जास्त खर्च करायचा असेलतर तो करण्यासाठी परवानगी दिलेली आहे. आयुक्तांचे आभार मानतो बजेटमध्ये शहरातल्या ज्या विशेष योजना चालू आहेत त्या विशेष योजनेमध्ये काहीही तरतूद केलेली नव्हती. काही योजना अर्धवट आहेत परंतु आमच्या दृष्टिने त्या तातडीने पुर्ण होणे आवश्यक आहे. वॉर्डातील इतर खर्च कमी करुन तसे बदल करुन घेतलेले आहेत. परंतु त्या सुध्दा तरतूदी कमी पडणार आहेत. आयुक्तांनी अपेक्षीत धरलेले आहे त्यात वाढ होण्याची शक्यता आहे कारण मंदी कमी झालेली आहे. उदयोग क्षेत्रामध्ये चांगले वातावरण निर्माण होत आहे पुर्वीप्रमाणे चांगल्याप्रकारे उदयोगधंदे चालले आहेत त्यामुळे आपले उत्पन्न वाढेल. जकातीची थकबाकी वसूल करण्यासाठी जकात विभागाचा बराचसा वेळ केसेस करणे,कोर्टात जाणे या करिता खर्ची पडत असतो. जकात विभागामध्ये एक स्वतंत्र कक्ष निर्माण करावा व जी वसूली आहे त्या वसुलीसाठीचे काम त्यांच्याकडे देवून त्यांनी त्याचा फॉलोअप केलातर व अडीचशे ते तीनशे कोटीची वसुली केलीतर निश्चितपणे पुढच्यावर्षी आपल्याला चांगल्याप्रकारे निधी उपलब्ध होऊ शकतो. मिळकतकरा बाबत वेळेवर मिळकतकर भरणा-यांना सिंगापुरची सहल आयोजित केलेली होती. आम्हांला सुध्दा वाटले की नवीन कल्पना आहे चांगली आहे परंतु मिळकत कर वेळेवर भरणा-या सर्व नागरीकांना न्याय मिळू शकत नाही. यासाठी पुण्यामध्ये वेळेवर मिळकतकर भरणा-यांना १० टक्के सवलत दिली जाते तशी सवलत आपल्याकडे चालू केलीतर चांगले होईल. जे लोक उशिरा कर भरतात ते १० टक्के बचतीमुळेतरी लवकरात लवकर कर भरतील. बजेटमध्ये नदी सुधार योजनेचा उल्लेख केलेला आहे. वास्तविक पाहता नदया या शहराचा अलंकार असतात,भूषणावह आसतात. सगळया शहराला नदया मिळत नाहीत. पवना नदी आपल्या शहरातून जाते आणि मुळा नदी स्पर्शून जाते. लवकरात लवकर फॉलोअप करुन योजना कशी मार्गी लागेल हे बघावे. आपण बाहेर बघतो त्याठिकाणी स्वच्छ पाणी असते तशाप्रकारे नदी सुधार योजनेतून केलेतर शहराचे सौंदर्य वाढेल. आपण प्रकल्प चालू केलेले आहेत त्या प्रकल्पामध्ये जागा ताब्यात नसल्यामुळे अडचणी आलेल्या आहेत. मग ती घरकुल योजना असेल किंवा बंद पाईपलाईन योजना असेल. या योजना जेव्हा चालू केल्या तेव्हा प्रशासनाला वाटत होते की जागा ताब्यात मिळतील परंतु अजूनपर्यंत त्या योजनांना विलंब होत आहे आणि खर्च वाढत चाललेला आहे. यापुढे योजना आखु त्यावेळेला ज्या जागा आहेत त्या प्रथम ताब्यात घेवून करावे. म्हणजे अशा रखडलेल्या

योजनांमुळे वाढीव खर्च होणार नाही. आयुक्तांचे अभिनंदन करतो कारण गेल्या वर्षभरात एकही वाढीव विषय स्थायी समितीपुढे आलेला नाही आम्ही स्थायी समितीमध्ये ई-टेंडरींग पध्दतीला मान्यता दिली त्यामुळे पुर्वी जे ३० ते ३५ टक्के अबोव्ह टेंडर यायचे त्याला आळा बसला आहे व आता २०-२५-३० टक्के बिलो पध्दतीने टेंडर येत आहेत त्यातून पैसे वाचतात. परंतु जेव्हा ही कामे चालू होतील तेव्हा प्रशासनाने त्यांची पाहणी करणे आवश्यक आहे कमी खर्चामध्ये टेंडर पास केले असलेतरी कामाचा दर्जा घसरता कामा नये याकडेही लक्ष दिले पाहिजे. पाणी मिटरच्या बाबतीत संपुर्ण शहरामध्ये चर्चा चालू आहे. नागरीकांना अनेक गोष्टीचा त्रास सहन करावा लागतो आहे. स्लॅब पध्दतीला मी विरोध केलेला आहे पाण्याचा जादा वापर केलातर जादा बील हे मान्य आहे. परंतु वाढीव स्लॅब पध्दत करणे  चुकिचे आहे.  बजेटमध्ये डियर पार्क वर १ कोटीची तरतूद केलेली आहे, हे पुर्ण होईल असे अपेक्षीत आहे. बर्डव्हॅलीमध्ये चांगले गार्डन झालेले आहे परंतू त्याठिकाणी  फुलपाखरु उद्यानामध्ये फुलपाखरे राहिलेली नाहीत तसे  डियर पार्कमध्ये होऊ नये त्याठिकाणी हरण दिसावेत असे करावे. चांगल्या योजना करतो, चांगल्या उद्देशाने करतो परंतु तो उद्देश शेवटपर्यंत पाळला गेला पाहिजे. नामकरण केलेले असते त्याला सार्थ असे काम केले पाहिजे. JNNURM मध्ये केंद्रशासनाचा जो वाटा आहे तो मिळतो परंतु राज्यशासनाचा मिळत नाही, आता ४३ कोटी राज्यशासनाने दिलेले आहेत आयुक्तांचे अभिनंदन करतो. त्यांनी असाच फॅालोअप चालू ठेवून राहिलेले पैसे लवकरात लवकर मिळवावेत  त्यामुळे वॉर्डातील कामाना चांगल्याप्रकारे पैसे शिल्लक राहतील. आगामी दिड वर्षे आमचे राहिलेले आहे. वॉर्डातील कामासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन दिला जावा.पुणे महापालिकेमध्ये अंदाजपत्रकासंबंधी नवीन योजना चालू केलेली आहे,अंदाजपत्रक प्रगती आढावा विभाग स्थापन केलेला आहे. आपण वर्षाच्या अंदाजपत्रकाला मान्यता देतो परंतु नंतर त्याचा फॅालोअप ठेवला जात नाही. वर्षभरात अंदाजपत्रकामधील किती काम झाले,किती काम राहिले,महसुल किती गोळा झाला यावर लक्ष ठेवण्यासाठी पुणे महापालिकेप्रमाणे आपल्याकडे सुध्दा तसा विभाग स्थापन करावा जेणेकरुन अंदाजपत्रकामधील काम पुर्ण होण्यास चालना मिळेल. आगामी काळात अंदाजपत्रकामधील प्रस्तावीत केलेल्या योजना पुर्ण करण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावेत असे आवाहन करतो.

मा.यशवंत भोसले  :- मा.महापौर साहेब, सन २०१०-२०११ चे बजेट सालाबादाप्रमाणे सादर करण्यात आलेले आहे.  आम्हांला निवडून येवून तीन वर्षे झाली आहेत. तीन बजेट आतापर्यंत मांडलेली आहेत.  बजेट  मांडले जाते परंतु बजेट मांडल्यानंतर त्याची कार्यपुर्ती झाली का नाही हे पाहिले पाहिजे. पुणे महापालिकेनी आढावा पध्दत या वर्षापासुन चालू केलेली आहे, जवळ जवळ २२०० कोटीचे मागच्या वर्षाचे बजेट सादर करण्यात आले आणि JNNURM मुळे निश्चित स्वरुपात चांगले पैसे आले त्यामुळे आयुक्तांचे अभिनंदन करेल मुख्यत्वे शर्मा साहेबांचे. कारण आपल्याकडे कामाचा वेग

आहे,प्रत्येक सभासदाच्या कामाच्या संदर्भातील माहिती आपल्याकडे आहे आणि सगळयात महत्वाचे कामे सुध्दा झाली पाहिजेत याबाबत आपण सहयोग करत असतात हे करत असताना काही अडचणी आमच्या सारख्या नगरसेवकंा समोर उद्‌भवतात. ११९२ कोटीची JNNURM ची आकडेवारी आहे व आपले ११८४ धरुन एकूण २३७६ कोटीचे या वर्षाचे अंदाजपत्रक सादर करत आहोत. मागच्या वर्षी सुध्दा या पध्दतीचे बजेट आपल्या समोर आलेले होते. मागच्या वर्षाच्या कामाचा जेवढा खर्च आम्ही केलेला आहे तो खर्च योग्य मार्गी लागला का नाही हे पाहणे तेवढेच गरजेचे आहे. जकातीच्या उत्पन्नातून ७५० कोटी आलेले आहेत ३२५ कोटी इतर विभागातून कर रुपाने जमा झालेले आहेत. या व्यतिरिक्त १०० कोटी कर्ज आपण बॅंकेतून घेत आहोत. पिंपरी चिंचवड परिसरातून हल्ली कंपन्या कमी होत चाललेल्या आहेत. बजाज सारखे उदयोग चाकण,लोणावळयाला गेले आहेत. जकातीच्या रुपाने येणारा पैसा कमी होत जाणार आहे खर्चाचा डोलारा एक हजार कोटी पर्यंत वाढेल आणि त्यातील ७०० कोटी कमी झालेतर भविष्यामध्ये काय ? त्यासाठी काही तरतूद केलेली नाही. आपण टॅक्स व पाणी बीलामध्ये वाढ केलेली आहे नागरीकावर बोजा टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. उदया जकातीचे परिणाम आम्हंाला भोगावे लागतील जकात बंद झालीतर मागच्या वर्षी १०० कोटी कर्ज काढले परत या वर्षी १०० कोटीचे कर्ज घ्यावे लागेल. मागच्यावेळेस जमिनी गहाण ठेवाव्या लागल्या आता लॅण्ड पीपीपी खाली विकायला लागलो आहोत. पीपीपीचा अर्थ पैसा पळवायचा पायंडा असा आहे. आमच्याकडे आर्थिक स्तोत्र निर्माण करणा-या जमिनी होत्या,महापालिकेकडे चांगले पैसे होते तेव्हा त्यावर कमर्शिअल कॉम्प्लेक्स उभे करु शकलो असतो आणि नागरीकांवर कराचा बोजा टाकू शकलो नसतो. दुर्दैवाने सोन्याचे अंडे देणारी कोंबडी संाभाळण्याऐवजी ती कापून टाकलेली आहे. याठिकाणी अतीशय चंागल्या पध्दतीचे बजेट सादर करत असताना चंागला निर्णय घेतलेला आहे तो म्हणजे पीएमपीएमएलला पैसे न देण्याचा. याठिकाणी भोंगळ कारभार झालातर येणारी पिढी आम्हंाला जाब विचारणार आहे. आम्ही जकातीच्या अपेक्षेवर किती टिकून राहणार आहोत. आम्ही कुठल्याहीप्रकारचे उत्पन्नाचे स्तोत्र निर्माण करु शकलो नाहीत याचे दु:ख आहे. नागरीकंाकडून पैसे वसूल करायचे हे काम थंाबले पाहिजे. आयुक्त साहेब, हुशार आहेत व महापौरंाचे डोळस असे व्यक्तिमत्व आहे. नागरीकंाच्यावर बोजा न पडता इतर मार्गाने पैसे कसे गोळा होतील हे पाहिले पाहिजे. घर विकून कोणी स्कोडा गाडी घेईल का ? असे करु नका. आम्ही मोठमोठे रस्ते केले, लाईटी लावल्या हे यातून करणे आवश्यक नाही. निम्मा खर्च आमचा कर्मचा-यांच्या पगारावर जातो, नंतर कर्मचा-यांच्या पगारासाठी सुध्दा पैसे शिल्लक राहणार नाहीत. भविष्यामध्ये जे डोलारे उभे केले आहेत त्यासाठी सुध्दा पैसे नसणार आहेत. आपण वायसीएम हॉस्पिटलमध्ये रुबी हॉलला भाडयाने जागा दिलेली आहे. त्यातून महापालिकेला किती फायदा आहे.त्याठिकाणी ॲन्जीओग्रॅफी करण्यास ९ हजार रुपये लागतात व तोच रेट बाहेर आहे. ॲन्लीजीओप्लास्टसाठी दोन ते तीन हजार कमी घेतले जातात, सर्वसामान्य जनतेला त्याचा काय फायदा झाला. आरोग्यावर आपण

करोडो रुपये खर्च करतो. २०१०-११ ला १५८ कोटी तरतूद ठेवलेली आहे. २००९-१० साली १६० कोटी खर्च झालेला आहे. वायसीएम हॉस्पिटलच्या कर्मचा-यांवर २३ कोटी पगारापोटी खर्च करतो आहोत. एवढा खर्च करुन वायसीएम हॉस्पिटलचा काय उपयोग आहे, कारण सर्व रुग्णांना औषधे बाहेरुन आणावी लागतात १८ कोटी औषधावर खर्च करतो आणि रुग्णांना बाहेरुन औषध आणायला लावतो असे असताना त्या रुग्णाना किती बेनिफीट मिळतो. कोणाचातरी धंदा व्हावा म्हणून हे आहे. BVG ग्रूपला स्वच्छतेचे काम दिलेले आहे. ११२ लोकांची त्याठिकाणी हजेरी लावली जाते आणि प्रत्यक्षात किती लोक कामाला आहेत हे पाहिले असता ३९ लोक त्याठिकाणी होते, बाकीच्या लोकांना असाच पगार दिला जातो. डॉ.नागकुमार यांच्यावर करोडो रुपयाची जबाबदारी दिलेली आहे. अनेकवेळा आयुक्तांच्या निदर्शनास मी ही बाब आणून दिली आहे,व्हिजीट रिपोर्ट दिले आहेत. ३९ लोक त्याठिकाणी BVG चे कामावर आहेत असे सांगीतले त्यावेळेस डॉ. नागकुमार यांनी उत्तर दिले की किती लोक द्यायचे हे ठरलेले नाही फक्त महिन्याला दोन कोटी त्यांना द्यायचे असे ठरलेले आहे. अशी आरोग्याची अवस्था आहे. पाण्याच्या बाबतीत सांगायचे झालेतर तीन वर्षे माझ्या वॉर्डातील १८०० घराना पाण्याचे नळ टाकण्यामध्ये गेले अजून २४० घराना टाकले नाही. इंजिनिअर काळे,सवणे व तुपे यांना फोन करणे हेच सदस्यांचे काम झालेले आहे. आता १५ हजार, २५ हजार, ३५ हजार असे बील आलेले आहेत. आम्ही बीलाचा बंच नेऊन दिलेला आहे. आपण म्हणत असाल २० टक्के बील अनागोंदी वाटतात परंतु अजून ४५ टक्के बीलांचे वाटप व्हायचे आहे ४० टक्के नळाला मिटर लावलेले नाहीत. ठेकेदारांनी ज्यांना मिटर लावले आहेत ते चुकिचे लावून पळून गेलेले आहेत. एक वर्षही झालेले नाहीतर मिटर तपासणीसाठी २०० रुपये भरा म्हणतात म्हणजे मिटर चेक करुन दिले जाईल नाहीतर ५१ हजार रुपयाचे बील भरा असे उत्तर दिले जाते. बजेट चांगले मांडलेले आहे आमच्या हातामध्ये ओरडण्याशिवाय काहीच नाही. २१ कोटीची वायसीएम मध्ये मशनरी खरेदी केलेली आहे. माझ्या वॉर्डामध्ये एकच मोठा प्रोजेक्ट आहे आणि तो म्हणजे वायसीएम हॉस्पिटल, त्याठिकाणी मोठमोठी मशनरी आहे. नागरवस्ती तर्फे महिला भगिनीना प्रशिक्षण देण्यासाठी गेल्या चार वर्षात ९ कोटी खर्च झालेला आहे. एक महिन्यापुर्वी मी अर्ज दिलेला होता कोणकोणते भगिनीना प्रशिक्षण दिलेले आहे याची यादी दया म्हणून ती अजून सुध्दा दिलेली नाही. त्याठिकाणी जगताप म्हणून अधिकारी आहेत ते म्हणतात जगदाळेकडे जा जगदाळे म्हणतात गायकवाड यांच्याकडे जा गायकवाड म्हणतात आठ दिवसात माहिती मिळेल आज नववा दिवस आहे. ज्यावेळेला २२०० कोटीचे बजेट करतो त्यावेळेला विश्वस्त म्हणून नगरसेवकांना एवढे काम करा म्हणून सर्वांच्या पाया पडावे लागते, सुपरवायझरला सुध्दा रिक्वेस्ट करावी लागते. जे बजेट दिलेले आहे ते व्यवस्थीत मार्गी लागते का नाही हे पाहणारी यंत्रणा आमच्याकडे नाही. गार्डन विभाग आहे त्याठिकाणी साळूंके म्हणून प्रमुख आहेत त्याठिकाणी तीन वर्षे झाले माती टाका,झाडे लावा म्हणतो व मी त्या गार्डनवर सदस्य म्हणून सुध्दा आहे.

ते फक्त फोनवर सांगतात यस सर आणि माझाच चहा घ्यायचा आणि जायचे असे आहे. माती किती टाकली हे सुध्दा बघावे लागते “ अरे उध्दवा अजब तुझे सरकार ” सर्वांनाच माहिती आहे आमचे कोणीही वाकडे करु शकत नाही. हे पाच वर्षासाठी हंगामी आहेत आम्ही परमनन्ट आहोत हे सर्वाना माहिती आहे.परंतु सर्वच कमवण्यासाठी नगरसेवक झालेले नाहीत, कष्ट करुन काहीतरी जनतेची सेवा करावी अशी आमच्या सारखी झीजणारी मंडळी आहेत त्यांचीतरी कदर आपण करावी जाता जाता एवढेच संागेल “ शेर ना शिकवा करते हैं ना गीला करते हैं, बस अधिकारी तुम सलामत रहो हम दुअॅा करते है,दुआँ करते है ”.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, प्रत्येक वर्षाप्रमाणे याही वर्षी बजेट सादर केले आहे. डेफिशियट बजेट आहे ते सरप्लस करुन दाखवलेले आहे. मी जे सांगणार आहे ते या आयुक्तांबद्यल नाही. आपण आल्याबरोबर तिजोरी खाली होती. तुमच्यासारखा माणूस होता म्हणून यापुढे चांगले दिवस येणार आहेत. या अगोदर तीन वर्षे या महापालिकेची वाट लागलेली आहे. सिव्हील कामाची चौकशी करा म्हणालो होतो. महापालिका सुधारणार नाही असे काम पुर्वी केलेले आहे. कमीत कमी १५० कोटीचे डेफिशियट बजेट आहे. १२५ कोटीचे बील मार्च पर्यंत काम केल्याचे आहे. हे काम एप्रिल मध्ये दाखवले आहे. डेफिशियट बजेट सरप्लस करुन दाखवलेले आहे. फिगर बद्यल काय बोलणार. १५० कोटीचे बील पेन्डींग होते. सगळे बिल एप्रिल-०९ नंतर दाखवलेले आहे. आम्हंाला इन्टरनल रोड,फुटपाथ,गटर हे महत्वाचे आहे. तुम्ही मोठमोठे प्रोजेक्ट करता त्यामुळे वॉर्डातील गटर,फुटपाथचे काम होत नाही. अनेकवेळा तूमच्याकडे आल्यानंतर तुम्ही काम सुरु करण्यास परवानगी देता परत ते काम बंद होते. मोठमोठे कॉन्ट्रॅक्टर पैसे दिल्याशिवाय काम करत नाहीत. आज सुध्दा वॉर्डामध्ये चालू असलेल्या कामाचे बील दिले नाही म्हणून काम बंद आहे. खालच्या लेअरचे बील दिलेले नाही म्हणून काम थांबतात. मोठमोठया प्रोजेक्टला बजेट देता ते द्या परंतु या वर्षामध्ये मोठा एक प्रोजेक्ट,पुढच्या वर्षामध्ये दुसरा मोठा प्राजेक्ट असे करायला पाहिजे. या बजेटमध्ये १०० कोटीचे कर्ज काढणार आहोत. त्यासाठी मॉर्टगेज करावे लागेल. शंभर कोटीला सी-सी देऊ शकत नाहीत का. मॉर्टगेज कशाला पाहिजे. कोणत्या प्रॉपर्टिचे मॉर्टगेज करणार आहात, कुठलेही कागदपत्र तयार नाहीत मग कसे करणार. से-२३ पाणीपुरवठा मॉर्टगेजमध्ये घेतलेले आहे. पाणीपुरवठयासारखी स्किम मॉर्टगेज करणार आहात ते चुकिचे आहे. उदगीर येथील नगरपालिकेनी पाणीपुरवठा स्किमचे मॉर्टगेज केलेले होते त्यावर अॅटॅचमेंट आलेली आहे. आता जकात बंद होणार आहे, आपण ईएमआय भरले नाहीतर सेम केस होईल पाणीपुरवठा स्किमचे मॉर्टगेज करु नका. कुठल्याही प्रॉपर्टिचे पेपरवर्क आपल्याकडे नाही. भूमि आणि जिंदगी विभागामध्ये फक्त चार लोक काम करतात त्यात दोन सर्व्हेअर आहेत त्या विभागाची अवस्था बिकट आहे. प्रॉपर्टि भाडयाने देताना कुठलेही डिपार्टमेंट अॅग्रीमेंट करते.

कुठल्याही प्रॉपर्टिचे लीज करताना पर्टिक्युर्लरली भूमी जिंदगी डिपार्टमेंटने करायला पाहिजे. BVG बरोबर अॅग्रीमेंट केले त्यांची कागदपत्रे भूमि आणि जिंदगी डिपार्टमेंटकडे आहेत का. डियर पार्क गार्डन विभागाने केलेले आहे त्या पार्कचे अॅग्रीमेंट त्यांनीच केलेले आहे त्याची कागदपत्रे भूमि आणि जिंदगीमध्ये नाहीत. त्यांना हे अधिकार नसताना ते कसे काय हे करतात. भूमि आणि जिंदगी विभागाला स्टाफ द्यावा. याबिल्डींगचे सुध्दा कम्प्लेशन सर्टिफिकेट नाही. आता मॉर्टगेज करायचे आहे म्हणून कागदपत्रे आणण्यासाठी गेलेले आहेत. लोन कशासाठी घेता, JNNURM चे बील भरण्यासाठी का. असेच कर्ज काढा १००-२०० कोटीचे आणि आमच्या वॉर्डातील सर्व कामे करुन टाका, वॉर्ड पॅाश करा. तुम्ही काम करता म्हणूनच आम्ही निवडून येतो. अनेक रस्त्यांचे डांबरीकरण झाले नाही. फुटपाथ नाहीत अशी परिस्थिती आहे. एक फुटपाथ करण्यासाठी एक वर्ष फॉलोअप केला आहे त्यानंतर तो केला. आम्हांला इन्टरनल काम महत्वाचे आहे. त्यासाठी सांगतो अजून १०० कोटीचे लोन घ्या परंतु वॉर्डातील इन्टरनल काम करा. गटर,लाईट,रस्ते हे महत्वाचे आहे. हे लास्ट बजेट आहे परत पुढच्या वर्षी निवडणूकीची आचारसंहिता लागू होईल. १०० कोटीचे कर्ज काढून वॉर्डातील सर्व रस्ते डांबरीकरण करावेत.व नंतर तीन वर्षात हे पैसे फेडावेत. ७० कोटीचे बील आपण सप्लीमेंटरी बजेटमध्ये टाकलेले आहे, हे पैसे कुठून येणार आहेत. ५० कोटीचे बील सिव्हील डिपार्टमेंटचे आहे. ते अकौंटकडे पेन्डीग राहणार आहे. ३० कोटीचे बील पुढच्या वर्षी करा असे सांगीतले आहे १५० कोटी ओपनींग बॅलेन्समध्ये डेफीशीट असणार आहे. मग आमच्याकडे किती पैसे राहणार आहेत. म्हणून सांगतो की १०० ते २०० कोटी कर्ज घ्या आणि वॉर्डातील काम करा. प्रॉपर्टि टॅक्स बद्दल सांगतो ते टार्गेटच्या जवळ गेलेले आहेत त्यांचे अभिनंदन करतो. त्यांचे कामकाज चांगले आहे परंतु समाविष्ट गावामधील प्रश्न अजून प्रलंबीत आहेत. २५ टक्के दरवाढ भरु शकतात. ते सुध्दा प्रपोजल शासनाकडे पाठविलेले आहे. मा.अजीतदादा पवार यांनी १९.११.०९ ला मुंबई येथे झालेल्या बैठकीमध्ये अधिका-यांना सोलापूर पॅटर्न राबवायला सांगीतलेला आहे, सूचना दिल्यानंतर सुध्दा त्याची अमंलबजावणी झालेली नाही. समाविष्ट गावातील अडचणी दुर कराव्यात टॅक्स वाढविलेला आहे. पाणीलाभ टॅक्स हा काय आहे हे माहित नाही. आता रोड टॅक्स आणता आहात. ८ टक्के टॅक्स वाढविलेला आहे. असे टॅक्स वाढविलेतर ज्येष्ठ नागरीकांना आम्ही काय उत्तर द्यायचे. हवेवर सुध्दा पुढच्या वर्षी तुम्ही टॅक्स घेणार. करयोग्य मुल्याच्या ४२ टक्के टॅक्स घेतो, अनेक लोकांना हे पटत नाही आपल्याकडे मॅजोरीटी होती म्हणून ८ टक्के वाढविले आहे.हे रिकन्सीडर करावे. JNNURM साठी १९० कोटी केलेले आहेत हे पुरणार का अधिक वाढीव जे टेंडर आहे १०,१२ टक्के त्याचे पैसे सेन्ट्रल गव्हर्मेंट देणार नाही. हे पैसे कोण देणार. यातील ३० टक्के तुम्ही कुठून देणार आहात, आमच्या वॉर्डासाठी जे पैसे दिलेले आहेत त्यातून डायव्हर्ट करणार आहात. पाणीपुरवठयाचे तुम्ही ३० लाख डायव्हर्ट केलेले आहेत. महाराष्ट्र शासनाने १०० कोटी दिलेले नाहीत आज ४३ कोटी दिलेले आहेत. मोठे प्राजेक्ट

थांबवावेत अन्यथा ही महापालिका बरबाद होणार आहे, आम्हांला भीक मागायला लावू नका. पाणीपुरवठया बद्यल बोलायचे झालेतर २५ वर्षापासून मी सांगतो की यासाठी आल्टरनेट सोर्स तयार करा. पवना नदीमधुन यापुढे पाणी मिळणार नाही, दुसरा सोर्स कुठे आहे. उदया पवना डॅमला काही झालेतर दुसरा सोर्स काय आहे. पुण्यामध्ये जसे घडले तसे झालेतर काय करणार आहात पुर्वी एक आंद्रा व्हॅलीचा प्रोजेक्ट आलेला होता १०० कोटी द्यायचे होते तो रिजेक्ट केलेला आहे. पाण्यासाठी आल्टरनेट सोर्स ताबडतोब पाहिजे. पवना डॅमवर अवलंबून राहू शकत नाहीत. रावेतमध्ये जनरेटर बसवायची गरज आहे. लाईट गेलीतर बॅलेन्सींग होण्यासाठी तीन दिवस लागतात. पाच-दहा कोटी जाऊ दया परंतु रावेतमध्ये जनरेटर बसवावेत. मीटर पध्दतीने पाण्याचे बील लावलेले आहे ते ८० टक्के लोकांना बरोबर आलेले आहे व २० टक्के लोकांना २० हजार,५० हजार असे आलेले आहे, प्रभागातील अधिका-यांना सांगावे हे बील दुरुस्त करुन द्यावे चार माणसाच्या कुटूंबाला २१ हजार बील आलेले आहे. यावर्षाची पाण्याची थकबाकी असेलतर नळकनेक्शन तोडू नका. मागील थकबाकी असेलतर ठिक आहे. मीटर रिडींग ठेकेदारानी घेतले पाहिजे, मीटरचे मेन्टेनन्स सुध्दा ठेकेदारानी करायला पाहिजे. त्याची जबाबदारी आहे मीटरला आम्ही विरोध करत नाही कारण ५० कोटी तुम्ही त्यामध्ये घालविलेले आहेत. पाच वर्षे मीटरचे मेन्टेनन्स ठेकेदार फ्रि ऑफ चार्ज करणार आहेत. मीटर रिडींग घेताना आपण काय रिडींग घेतो हे पब्लिकला दाखविले जात नाही. त्यांना इन्स्ट्रक्शन द्यायला पाहिजेत की ज्या वेळेस मीटर रिडींग घेतो त्यावेळेला त्या घरातील नागरीकांना ते दाखविले पाहिजे. कार्डवर त्यांची सही घ्यावी. डांबरी रस्त्यासाठी ४५ कोटी प्रोव्हीजन आहे. १ कि.मी.रस्त्याला ६० ते ७० लाख खर्च येतो. ४५ कोटीमध्ये सगळया रस्त्यांचे डांबरीकरण होणार का. माझ्या वॉर्डात १५ कि.मी.चे रस्ते आहेत, राजू मिसाळ यांच्या वॉर्डात १५ कि.मी. चे रस्ते आहेत व तुम्ही त्यासाठी १ कोटी दिलेले आहेत त्यामध्ये तीन कि.मी.रस्ता होणार आहे तरी याठिकाणी फंड वाढवावा व सर्व रस्ते डांबरीकरण करण्याचा प्रयत्न करावा. पेव्हींग ब्लॉक आणि फुटपाथसाठी एका वॉर्डला २० लाख देणार आहेत त्यामध्ये हे होत नाही. याठिकाणीही तरतूद वाढवावी. कर्ज घ्या परंतू वॉर्डातील कामे करा. उदयानासाठी १० कोटी दिलेले आहेत. त्यामध्ये एक गार्डनसुध्दा करु शकणार नाहीत. एकही नवीन काम करु शकणार नाहीत. दुर्गादेवी टेकडीवर फिश एम्पोरियम, महाराष्ट्रातील किल्ले तयार करा म्हणून संागीतले होते त्यासाठी १० लाख सुध्दा आपल्याकडे नाहीत. गार्डन करायचे असेलतर JNNURM चे काम कमी करा आणि गार्डनमध्ये तरतूद दया. सिटी सेंटर, बीओटीमधुन पैसे मिळणार आहेत ते उत्पन्नामध्ये घेतलेले नाहीत. अ-प्रभागात विदयूत विभागासाठी फक्त ६ कोटी तरतूद ठेवलेली आहे. त्यामध्ये २७ वॉर्डामधील मेन्टेनन्ससाठी एक ते दिड कोटी जाणार आहेत राहिलेल्या चार ते पाच कोटीमध्ये अंडरग्राऊंड केबलचे काम कसे होणार आहे. माझ्या वॉर्डात ७० टक्के अंडरग्राऊंड केबल झालेले आहे व ३० टक्के बाकी आहे. साडेचार कोटी पुरणार नाहीत. गेल्यावर्षी

४५ कोटी दिलेले होते या वर्षी कमी का केले यामध्ये कसे काय काम करणार आहेत. बीआरटीएसचे डेमोस्ट्रेशन दाखविलेले होते त्यावेळेला फेज-१ सक्सेसफुल झाल्यानंतर फेज-२ व ३ करायचे असे होते. १०० कोटीचे आपले कॉन्ट्रीब्युशन आहे हे बरोबर नाही. तीन बीआरटी एकदम नको. त्यामुळे सर्व इन्टरनल कामे थांबतात. वॉर्डातील काम पहिले करावे नंतर मोठे प्रोजेक्टचे काम करावे. नागरीक आधार केंद्र, हेल्पलाईन सुरु करणार आहेत हा चांगला प्राजेक्ट आहे. कॅन्सर युनिटचे सागीतले आहे यासाठी गेल्यावर्षी सुध्दा प्रोव्हीजन होती, यावर्षी ते व्हायला पाहिजे. वायसीएम हॉस्पिटलमध्ये अनेकवेळा व्हिजीटला गेलो त्याठिकाणी स्टाफ कमी आहे. प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये एका आयसीयूला एक डॉक्टर आहे याठिकाणी तसे नाही. पदे मंजूर नसतीलतर कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर घ्या. त्याठिकाणी सध्या असलेल्या स्टाफवर लोड पडतो. ३० ते ४० टक्के स्टाफ कमी आहे तो ताबडतोब भरावा. घरबांधणी कर्जासाठी तरतूद केलेली आहे ती तरतूद वाढवावी व भूमि आणि जिंदगी डिपार्टमेंटला स्ट्रॅांग करावे तेथील कर्मचारी वाढवावेत, जे काम त्यांनी करायचे आहे ते त्यांनीच करायला पाहिजे. ऑलरेडी ज्या डिपार्टमेंटकडुन हे वाटप झालेले आहे त्यांचे कागदपत्र परत या डिपार्टमेंटला येऊ दयावेत. वॉर्डातील इन्टरनल कामाबद्यल लक्ष द्यावे, बजेटमध्ये तरतूद पुरेशी नसेलतर कर्ज काढावे आणि वॉर्डातील सर्व काम करावे.

मा.जावेद शेख :- मा.महापौर साहेब, बजेटचा अर्थ काय आहे हे वॉर्ड क्रमांक ५२ ला अजीबात माहितच नाही. बजेटमध्ये ज्या तरतूदी केल्या जातात त्यामध्ये शहराचा सर्वांगीण विकास होतो का हा मुळ प्रश्न आहे. बजेटच्या संदर्भात सोनवणे, कुमार,भोसले यांनी आपआपली मते मांडली आहेत. अंदाधुंदी कारभारावर लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलेला आहे. माझ्या वॉर्डासाठी गटर,वायरींग,डांबरीकरण,आरोग्य हे तेथील प्रश्न आहेत. नागरीकांचा मुलभूत अधिकार आहे. ८२ ला महापालिका झाली व ८५ ला त्याठिकाणी घोषणा झालेली आहे ११ जागा रिझर्व्हेशनमध्ये आहेत. बजेटमध्ये उदयानासाठी, कम्युनिटी हॉलसाठी, शाळेसाठी तरतूदी केलेल्या आहेत. या बजेटचा वॉर्ड क्र. ५२ ला काय फायदा होणार आहे हे सांगावे. त्याठिकाणी ११ जागा रिझर्व्हेशनमध्ये आहेत त्यातील एकही जागा नागरीकांना वापरण्यासाठी भेटलेली नाही त्याबद्यल काय करणार आहेत. वॉर्डामध्ये बजेटचा अर्थ लोकांना समजत नाही. आता पीपीपी म्हणजे पैसा पळवण्याचा पायंडा असे भोसले यांनी सांगीतले आहे परंतु मी असे सांगेल की प्रॉपर्टि पळवण्याचा पायंडा. महापालिकेच्या जागा भाडयाने देतो, विकतो. महापालिकेनी आपल्या जागेवर परमिशन दिलेली आहे त्याची लेखी तक्रार दिलेली आहे त्यास ३५५ दिवस झालेले आहेत ३६५ दिवसात काम केले नाहीतर उच्च न्यायालयामध्ये जाऊ शकतो असे आहे. शहरासाठी डीयर पार्क योजना आणलेली आहे मुलभूत अधिकार आहेत. १४ वर्षाच्या आत मुलाला शिक्षण देण्याची जबाबदारी महापालिकेची असते. आकुर्डीमध्ये वॉर्ड क्र. ५२ वर अभिलेखाच्या जागा आहेत १९९५ ला त्या घोषीत

झालेल्या आहेत त्यातील एकही जागा भेटलेली नाही या शहराचा सर्वांगीन विकास होतो का. एकही जागा भेटली नाही यावर मिटिंग घ्यावी. माझ्या वॉर्डामध्ये दोन उदयान आहेत त्यातील एकतरी जागा नागरीकांच्या वापरासाठी द्यावी. मोठमोठे प्रोजेक्ट केलेले आहेत जे अभिलेख मधील,लोकांच्या मुलभूत अधिकारा मधील आहेत ते पहिले पुर्ण करा. मी बिनविरोध निवडून आलेलो आहे लोक मला विचारतात. या कारभारावर महापौर साहेब आपण जातीने लक्ष घालावे. माझे वॉर्डातील ११ जागांसाठी या बजेटमधुन पैसे द्यायला पाहिजे होते,त्या जागा नागरीकांच्या उपयोगामध्ये यायला पाहिजे होत्या. वॉर्ड क्र.५२ कडे, जावेद शेख कडे न पाहता आजूबाजुच्या नागरीकांकडे पाहून समर्थन दयावे. मी प्रश्न करतो त्याचे कागदी उत्तर देण्यामध्ये प्रशासन तरबेज झालेले आहे पध्दतशिरपणे उत्तर मिळते. आपण पाठविलेले मुद्दे आमच्या कार्यालयाशी संबंधीत नाहीत, असे उत्तर देतात. कलम १९ विसरलेले आहेत त्यातील तरतूदी सुध्दा विसरलेले आहेत. एखादया व्यक्तिने माहिती विचारलीतर त्याचा प्रश्न पुर्णपणे लिहून घ्यावा असे आहे. याठिकाणी कटवायचे कसे हे माहित आहे. महापौरांना विनंती करीन की, आपण वॉर्ड क्रमांक ५२ ला व्हिजीट द्यावी,आयुक्तांनाही बरोबर घ्यावे,अभिलेख घ्यावा. व आकुर्डीकरांसाठी व्यवस्था व्हावी. आकुर्डीकरांवर टॅक्स,पाणीपट्टी,घरपट्टी किंवा शासकीय जो टॅक्स आहे तो आकारला जातो आणि नागरीक तो भरतात. ज्या जागेवर गुंठेवारी होत नाही त्या जागेवर सुध्दा गुंठेवारी केलेली आहे लोकांना त्यांचे मुलभूत अधिकार नाहीत तर या बजेटचे काय करणार आहेत. कुमार साहेबांनी सांगीतले आहे मोठे प्रकल्प थांबवा. १९९५ मध्ये घोषणा झालेली आहे त्या जागा मिळाल्या का. ४० टक्केतरी जागा द्याव्यात. अधिका-यांनी चुका केलेल्या आहेत त्या दाबण्याकरिता नागरीकांना का त्रास देता. मी मागे प्रश्न विचारले होते त्याचे लेखी उत्तर देतो म्हणाले होते ते सुध्दा दिलेले नाही. ११ जागांमधून आम्हांला किती जागा भेटणार आहेत. पुढच्या बजेटला पुन्हा आचारसंहिता लागू होणार आहे. या वर्षभरात प्रशासनाने वॉर्ड क्र. ५२ मधील ११ जागेतून निदान ४० टक्के जागेवर काम चालू केले नाहीतर जावेद शेखला आत्मदहन करावे लागेल अन्यथा नागरीकांना अधिकार मिळणार नाही असे सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो. नागरीकांना मुलभूत अधिकार या बजेटच्या माध्यमातून मिळाले नाहीत तर नक्कीच मला आत्मदहनाचा इशारा द्यावा लागेल. या महापालिकेच्या जागा आहेत. डुंबरे साहेबांबरोबर दोन तास मिटिंग घेतलेली आहे आपण स्पष्टपणे कार्यवाही करत नाहीत. श्रीमंत असलेली ही महापालिका आहे व या महापालिकेला कर्ज घ्यावे लागते आहे. महापौर साहेब, आकुर्डीकरांची व्यथा बघावी. ११ जागा द्यायला हव्यात, प्रत्येकाच्या वॉर्डात एकतरी जागा मिळालेली आहे व माझ्याकडे पुर्णपणे अन्याय झालेला आहे. ११ पैकी चार ते पाच जागा गायब केलेल्या आहेत. ११ जागांमधील काहीतरी जागा द्याव्यात जो भ्रष्टाचार झालेला असेल त्या बद्यल बोलण्यास काही अर्थ नाही. शहराच्या विकासाच्या दृष्टिने आकुर्डीकरांचा विचार करावा या इन्टरनेटच्या युगात सुध्दा अंदाधुंदी कारभार चालतो आहे. वॉर्ड क्र. ५२ ला

डांबरीकरण,फुटपाथ असेल या व्यतिरिक्त त्यांना जे मुलभूत अधिकार द्यायला पाहिजेत ते द्यावेत. तूमच्या तरतूदी असतीलतर त्याचा अभ्यास करावा. या देशाच्या संविधानाला खाली बघण्याची वेळ आलेली आहे ते होऊ देणार नाही त्यासाठी मला नागरीकांसाठी आत्मदहन करावे लागलेतरी ते करेल. शहराचा एकत्रित विकास व्हावा आणि सर्व सदस्यांच्या ज्या अडचणी असतील त्यांना समन्वयाने न्याय द्यावा.मोठे बघुन,पक्षावाले बघुन काम होऊ नये. सादर केलेल्या बजेटबद्यल स्थायी समितीचे अभिनंदन करतो. महापौर साहेब आपण अनुभवी आहात आपण नक्कीच आकुर्डीसाठी न्याय द्याल तेथे भाजीमंडई सुध्दा चुकिच्या जागेवर झालेली आहे भरपूर अन्याय झालेला आहे तरी अकुर्डीकराना न्याय द्यावा.

मा.मच्छिंद्र तापकीर :- मा.महापौर साहेब, २०१०-११ चे २२०० कोटीचे बजेट सादर केले आहे. आपण फक्त बजेट मंजूर करतो. पिंपरी चिंचवड शहरामध्ये ८० टक्के लोकांना बजेट म्हणजे काय हे माहित नसते. त्यांना फक्त एवढे माहित असते आज लाईट नाही, घरपट्टी वाढली, रस्ते खराब झाले हे त्यांचे प्रॉब्लेम असतात. आपण जे बजेट करतो ते माझ्या डोक्यामध्ये आता घुसायला लागले आहे. जे ठेकेदार आहेत ते स्वत: बील तयार करुन अधिका-यांची सही घेण्यासाठी त्यांच्या पाठिमागे पळतात. अधिका-यांना बजेट करायचे समजत नाही.  काळेवाडीवर अन्याय झालेला आहे. डीपी चे रस्ते, लाईट, त्याठिकाणी फक्त पुलच झालेले आहेत खादीचे कपडे घालून हॉटेलमध्ये जायचे त्याठिकाणी दहा-पंधरा चहा सांगायचे, बाहेर जाताना खिशात हात घालायचा बाजूचा कार्यकर्ता  बघतो आणि स्वत:च्या खिशात हात घालून बील भरतो तशी आपल्या महापालिकेची परिस्थिती आहे. मागचे बील दिलेले नाही. ठेकेदार आणि अधिकारी यांचा ताळमेळ घातलातर परिस्थिती सुधारेल. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने प्रशासनाला शुभेच्छा देतो.

मा.अपर्णा डोके :- मा.महापौर साहेब, मागच्या वर्षीप्रमाणे उपसूचना न देता अर्थसंकल्प मंजूरीसाठी सभागृहासमोर आलेला आहे. खरेतर आयुक्तांचे कौतूक करावे तेवढे कमी आहे. त्यांची तारेवरची कसरत आहे.  नागरीक कराच्या रुपाने महापालिकेत रक्कम देत असतात त्याचा त्यांना ख-या अर्थाने फायदा झाला पाहिजे. छोटयाछोटया योजना आहेत त्या मांडते त्या  या आर्थिक वर्षात पुर्ण व्हाव्यात गेल्यावर्षी नेत्रपेढीसाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद केलेली होती यावर्षीचा अर्थसंकल्प झालातरी  नेत्रपेढी झालेली नाही तरी ही नेत्रपेढी असणे आवश्यक आहे. नागरीकांना देहदान,नेत्रदान असेल हे कुठे करायचे हा प्रश्न येतो त्यावेळी इच्छा असून सुध्दा ते करु शकत नाहीत. लायब्ररीची सुध्दा अशीच व्यथा मांडलेली होती अजून त्यात बदल झालेला नाही. पुस्तक खरेदीस विलंब होतो. नवीन पुस्तके बाजारामध्ये येत असतात त्यासाठी लागणारे कपाट,साहित्य योग्य वेळी खरेदी केले जात नाही. नागरीकांमध्ये वाचनाची आवड

असते. स्पर्धा परिक्षा सुध्दा महत्वाची आहे अभ्यासिकेचा प्रश्न सुध्दा मार्गी लागलेला नाही. महिलांसाठी विवीध योजना करत असतो त्यातील शिवणयंत्र,सायकल वाटप याच्या व्यतिरिक्त ज्या योजना आहेत त्यामधे पाळणाघर ही योजना होती एकही योजना पाळणाघराला उपयूक्त ठरली नाही. विधवाना पाच हजाराचे अनुदान देतो त्याच्या ऐवजी येत्या वर्षात विधवा महिलांना पेन्शनच्या रुपाने योजना अवलंबीता आलीतर ख-या अर्थाने ती चांगली योजना होईल. त्याचप्रमाणे महिला स्वच्छतागृह हे महिलांसाठी गर्दीच्या ठिकाणी एकही नाही. या छोटयाछोटया गोष्टी असतात परंतू त्याकडे लक्ष द्यायला पाहिजे. वृध्दाश्रम असेल,निराधर महिला आश्रम असेल, अग्निशमन विभाग असेल याकडे दुर्लक्ष होते. आग लागली की तो विभाग दिसतो. वाढती लोकसंख्या बघून त्यांना सुध्दा प्राधान्य दिले पाहिजे. स्मशानभूमी,जकात नाके असतील त्याठिकाणी स्वच्छता पाहिजे, स्मशानभूमी चांगल्या स्थितीमध्ये असावी नागरीकांना मुलभूत गरजा देणे आवश्यक आहे. कचरा आणि आरोग्य यात बदल होत नाही. कच-याची समस्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. मोशी सोडलीतर कुठेही कचराडेपो नाही. भविष्याचा विचार करता शहरातील नागरीकांना त्रास होणार नाही असे करावे. या प्रकल्पाकडे निश्चित लक्ष द्यावे.

मा.सुलभा उबाळे :- मा.महापौर साहेब, बजेटमध्ये आपण उपसूचना घेणार आहात का नाहीत. आम्ही बोलायचे कशासाठी. बजेटमधील तरतूदीत आपण बदल करणार नसालतर याठिकाणी एवढया तळमळीने बोलले आहेत त्यांचे काय. फक्त बोलायचे आणि घरी जायचे हे सभासदावर अन्यायकारक आहे ज्याठिकाणी वॉर्डस्तरीय तरतूद केलेली असेल त्यामध्ये ज्येष्ठ नगरसेवकांनी सांगीतले होते तरतूद कामासाठी अपुरी आहे. आम्हांला निवडून येवून तीन वर्ष झाले आहेत. मागच्या वर्षामध्ये दोन आचारसंहिता लागलेल्या आहेत त्यामुळे बजेट लॅप्स झालेले आहे. सुरवातीला दोन वर्षामध्ये मोठमोठी कामे झालेली आहेत. वॉर्डात लक्ष घालावे. नागरीकांकडून टॅक्स गोळा करतो,टॅक्स वाढवितो,पाणीपट्टी वसुल करतो. वॉर्डातील लोक सांगतात आमच्या येथील डांबरीकरण करा, कच-याची व्यवस्थीत विल्हेवाट लागत नाही याकडे लक्ष नाही. आयुक्तांचे कौतूक झालेले आहे कारण वाढीव खर्च त्यांनी संपुर्णपणे थांबविलेला आहे. हे करत असताना स्थानीक वॉर्डामध्ये दुर्लक्ष झालेले आहे. वॉर्डामध्ये ५० लाख लागणार असतीलतर ५ लाख दिलेले आहेत त्यामध्ये कसे काय काम होणार आहे. ५ लाखाचे ५० लाख दिलेतर स्थानीक नगरसेवकांचा विरोध राहिल असे वाटत नाही. आम्ही एखादे काम सांगीतलेतर दोन्ही हात वरती करतात आम्ही काही करु शकत नाहीत अशी त्यांची भूमिका असते. महाराष्ट्र शासनाचे अनुदान आलेले आहे. EWS प्रोजेक्टची घोषणा ज्यांनी केली ती का केली हे आम्हांला समजत नाही. तो प्राजेक्ट अपुर्ण अवस्थेमध्ये आहे. आज आयुक्त चक्रव्यूहमध्ये अडकलेले आहेत. लोकांना स्वप्न दाखविण्याचे पाप केलेले आहे त्यामध्ये सहभागी झालेल्या जागा आपल्या ताब्यात नाहीत. EWS चे भविष्य काय आहे. ते काम संथ गतीने चाललेले आहे. झोपडपट्टीच्या

बिल्डींग चालू आहेत तीन चार महिन्यात त्या होतील परंतु EWS चे काय. हे अंगावर घेतलेले ओझे आहे. ते पुर्ण केले नाहीतर जनता आपल्याला माफ करणार नाही. EWS चे काम निकृष्ट दर्जाचे झालेले आहे.आपण नागरीकांकडून घेणारी रक्कम वाढविणार आहोत असे आमच्या कानावर आलेले आहे. नागरीकांकडून एक-एक लाख जास्त घेणार आहात असे समजलेले आहे याचा खुलासा करावा. ६ हजार घरे बांधून किती लोकांना ते देणार आहेत. ते लोक हेलपाटे मारतात, आम्हांला नक्की घर मिळणार का म्हणून विचारतात. ही योजना होईपर्यंत लोक जीवंत राहतील का नाही हे समजत नाही. EWS ची योजना व्यवस्थीत मार्गी लावावी अशी आमची इच्छा आहे. बजेट तयार करताना ७० ते ७२ नागरीकांकडून सूचना आलेल्या आहेत. आपल्या शहराची लोकसंख्या १५ लाख आहे व एवढया लोकसंख्येच्या शहरातून ७० ते ७२ सूचना याव्यात ही चांगली गोष्ट नाही. नागरीकांचा सहभाग वाढविला पाहिजे. करसंकलन विभागाचे आताच कौतूक केलेले आहे. आपल्याला माहिती आहे जकाती बाबत बोलले जाते, जकातीचा पुढचा टप्पा बंद होण्यास येईल त्यावेळेला आपला नंबर लागेल. जकात बंद होईल पण करसंकलनाचे उत्पन्न हे कायमस्वरुपी आपल्या पाठिमागे राहणार आहे. मी सुध्दा त्यांचे अभिनंदन करते. यामध्ये अजून मिळकतीच्या नोंदी राहिलेल्या आहेत. यामध्ये अजून जास्त काम आपण करु शकतो. सिंगापूरची योजना एक वर्षे झाले आहे आता बास झाले. मुदतीमध्ये जे लोक टॅक्स भरणार आहेत त्या प्रत्येक लोकांना बक्षीस योजना लागू झाली पाहिजे. नाहीतर पुढच्या वर्षी लोक मुदतीमध्ये टॅक्स भरणार नाहीत. जास्तीत जास्त नागरीकांनी लवकरात लवकर टॅक्स भरावा यासाठी १० टक्के सवलत प्रथम टॅक्स भरणा-या लोकांना द्यावी म्हणजे आपल्याला फायदा होईल. वॉर्डस्तरीय कामाचे सांगीतले आहे त्यास दुय्यम दर्जा देवु नका. पीएमपीएमएलच्या बाबतीत चेअरमननी सांगीतले आहे पैसे देणार नाही,मुदत संपलेली आहे. पीसीएमटीच्या कर्मचा-यांना त्याठिकाणी दुय्यम दर्जा व वागणुक मिळते. आपण जास्त पैसे देत असताना त्याठिकाणी मानाचे स्थान मिळत नाही. त्याठिकाणी अनुकंपा तत्वावर लोक आहेत. पैसे देण्याची मुदत संपलेली आहे परत पैसे देणार का,तरतूद केलेली नाही, पैसे द्यावे लागलेतर काय करणार आहेत. कुठल्याही पदाधिकारी, मंत्री यांच्याकडून मागणी आलीतर आपण नाही म्हणून सांगावे अन्यथा पीसीएमटी वेगळी करावी. आपले बाळ आपण सांभाळतो दुस-याचे का सांभाळायचे. वर्तमानपत्रामध्ये वाचलेले आहे की वीजमीटरमध्ये कोटयावधी रुपये अडकून पडलेले आहेत. आपल्या बीलावर वीजमंडळाच्या कर्मचा-यांचा पगार होतो. मा.पालकमंत्री एमएसईबीचे मेन आहेत त्यांच्याकडे हे खाते आहे. ज्या पध्दतीने आमच्याकडून पैसे घेतले जातात तसे आपले त्यांच्याकडे असलेले पैसे लवकरात लवकर वर्ग करावेत. बंद पाईलाईन योजना सुरवातीला ६० कोटीमध्ये होणार होती आता ४१० कोटीपर्यंत आलेली आहे. आयुक्त त्याठिकाणी जावुन हे करु शकत नाहीत. त्याठिकाणी राजकीय मंडळी काम करतात, पिंपरी चिंचवड शहराला त्याठिकाणाहून पाणी मिळणार आहे तो प्रश्न सोडवावा. आज

२३०० कोटीचे बजेट मांडतो आहोत आणि दुसरीकडे शहराला पाणी पुरवू शकत नाहीत. त्या शेतक-यांच्या मागण्या काय आहेत हे बघावे. हे शासनाचे सुध्दा काम आहे, महापौर साहेब आपण यामध्ये लक्ष घालून बंद पाईपलाईन योजना लवकरात लवकर पुर्ण करावी. बिल्डींग परमिशन डिपार्टमेंट कडे लक्ष आहे का नाही. ब-याचशा बिल्डर्सनी कम्प्लेशन घेतलेले नाही. आपल्या डिपार्टमेंटमधुन या लोकांना मोकळे सोडलेले आहे. टिडीआर एफएसआय बद्यल सुळसुळाट झालेला आहे त्याबद्यल महापालिकेचे नुकसान होत आहे. ज्या लोकांनी बिल्डींग कम्प्लेशन घेतलेले नाही त्यांना ते घेण्यासाठी सांगावे याकडे लक्ष दिले पाहिजे. पीसीएनटीडीएचे ५०० कोटीचे शिल्लकी बजेट आले आहे. आम्ही सुविधा करुन दिल्या नसत्यातर त्यांचे प्लॉट विकले गेले नसते. ट्रान्सफर चार्जेस ते ४० टक्के पर्यंत घेतात ते आपल्या जीवावर पैसे कमावत असतीलतर त्यांच्याकडून आपण जेवढे विकासाचे काम करु तेवढा त्यांचा सहभाग असायला पाहिजे. पीसीएनटीडीएला सुध्दा खर्च करण्यासाठी भाग पाडावे. आज शहरामध्ये ट्रॅफिक अंदाधुंद चाललेली आहे. त्याठिकाणी ट्रॅफिक वॉर्डन नेमलेले आहेत ते फक्त गाडी सोडण्यासाठी हात करत असतात, गाडी थांबविण्यासाठी नाही कारण त्यांचे कोणीही ऐकत नाही. ज्यांना हे कॉन्ट्रॅक्ट दिलेले आहे त्यांना व्यवस्थीत पगार दिला जात नाही. तसेच साफसफाई कर्मचा-यांचे सुध्दा आहे. आपण बील देतो परंतु नागरीकांना सुविधा मिळते का नाही याकडे लक्ष द्यावे. जेंडर बजेटची एकूण तरतूद २१ कोटी केलेली आहे. आपल्याकडे तरतूद जास्त आहे. ९ कोटी व्यावसायीक शिक्षणाला घालवतो त्याचा आवूटपुट दाखवावा कित्येक योजना या कागदावर आहेत अशा योजना कशाला चालू ठेवल्या आहेत त्यात बदल केला पाहिजे. आपण बचत गटाना अनुदान देतो,आम्ही कौतूक करतो, २० महिला एकत्र येवून बचत गट चालवितात व अनुदान मिळाल्यानंतर ते आपआपसात वाटून घेतात व तो बचत गट बंद करुन दुस-या बचतगटामध्ये जातात. तरी त्यांना हे अनुदान दिले जाते ते मिळायला पाहिजे परंतू ते रोजगाराच्या माध्यमातून दिले पाहिजे, त्यांना मदत केली पाहिजे परंतु कॅश पैसे न देता रोजगाराच्या माध्यमातून ते चांगले काम करतील. एमएसडब्ल्यू हे रात्रंदिवस काम करतात त्यांना परमनन्ट करावे म्हणजे आणखी काम व्यवस्थीत होईल. पाण्याच्या बाबतीत ज्या कंपन्यानी हे पाणीमीटर बसविलेले आहेत त्यांना तुम्ही बोलवून घ्यावे. आज चारही प्रभागाचे अधिकारी याठिकाणी नाहीत ते पाण्याच्या फाईलीमध्ये डोके घालून बसलेले आहेत. त्या ठेकेदाराला संपुर्ण पैसे दिलेले होते, मीटर त्यांनीच बसवायचे, रिडींग त्यांनीच घ्यायचे, मेनटेनन्स त्यांनीच करायचा, असे ॲग्रीमेंट असताना त्यात बदल केला गेला आहे आणि ते काम काढून आमच्या प्रशासनाच्या माथी मारलेले आहे. मुळ ॲग्रीमेंटची अमंलबजावणी करावी. त्यांचे काम त्यांनीच करावे. पेमेंट घेवून ठेकेदार निघून गेलेले आहेत. आज आमच्या लोकांना मिटरसाठी पैसे भरावे लागतात. थेरगावला गेलेतर त्याठिकाणी सांगतात मिटर शिल्लक नाहीत व आपले अधिकारी ॲव्हरेज बील मारतात. लोक तक्रारी करण्यासाठी दोन-चार तास उभे

असतात. नगरसेवक सुध्दा जावू शकत नाहीत कारण त्यांच्या हातात काही ठेवलेले नाही. आता मिटरनिरीक्षक कामाला लागलेले आहेत. अनाधिकृत नळकनेक्शनबद्यल उपाययोजना नाहीत. मिळकतीना नळजोड मॅच करावेत म्हणजे ते शोधता येईल. आमच्या भावनांचा वर्षभरामध्ये विचार करावा.

मा.आझमभाई पानसरे :- मा.महापौर साहेब, ब-याचशा सदस्यांनी वेगवेगळी माहिती दिलेली आहे आणि काही लोकांनी गंभीर आरोप सुध्दा केलेले आहेत. प्रशासन ऐकून घेते,कार्यवाही करत नाही. परत पुढची जी.बी. येते त्यावेळेला नगरसदस्य आपला विषय पोटतीडकिने मांडतात परंतू निर्णय होत नाही. सुरवातीला यशवंत भोसले यांनी BVG संदर्भात विषय मांडला. १५० कामगार वायसीएममध्ये कामावर असताना ३९ लोक त्याठिकाणी होते. असे जे जे आरोप केलेले आहेत त्यावर चर्चा होते परंतू निर्णय होत नाही. पाण्याच्या संदर्भात भरमसाठ बील आलेले आहे. आयुक्तांनी सांगीतले आहे २० टक्के परंतु ज्या आर्थी एखादा माणुस २० टक्के स्वत:हून म्हणत असेलतर ४० टक्के तर नक्कीच असेल. सांगायचे तात्पर्य आपण कुठेतरी चुकतो. काम करत असताना कमीत कमी चुका झाल्या पाहिजेत. महापालिकेचेही नुकसान होवू नये. ज्यावेळेला आपली परिस्थिती खराब असते त्यावेळेला आपल्या हातून कुठलीही चुक झाली नाही पाहिजे तरच चांगल्या पध्दतीने काम करु शकु. कुमार साहेबांनी सांगीतले १५० कोटीचे बजेट डेफिशियट आहे परंतु काही प्रश्न असे आहेत की ते करणे आवश्यक आहे. कॅन्सर युनिटच्या संदर्भात ब-याच वर्षापासूनची मागणी होती ती तशीच पेन्डींग आहे. आय-बँक संदर्भात सांगीतले आहे. मार्च महिन्यामध्ये परिक्षा असतात त्यावेळेला विद्यार्थी जास्त अभ्यास करत असतात व पास होतात. परंतु जो वर्षभर अभ्यास करतो त्याला परिक्षा सोपी जाते. दर महिन्याला ज्या ज्या वेळेस सदस्य आपल्या महापालिकेच्या संबंधीत विषय मांडत असतात त्या त्यावेळेला त्याकडे गांभीर्याने पाहून त्यात चुक असेलतर ती दुरुस्त केली पाहिजे. चुकिची गोष्ट आढळून आलीतर आयुक्तांनी मागे पुढे न पहाता जो कोणी चुक करत असेल त्याबाबत कडक धोरण घेतले पाहिजे. फायनानशिअल कन्डीशन खराब असल्यामुळे आता कुठल्याही परिस्थितीमध्ये चुक करता कामा नये. बजेटमध्ये अधिक बोलायचे नाही. अधिका-यांना डोळयासमोर ठेवून आपण काम करतो किंवा एखाद्या अधिका-याकडे जास्तीत जास्त चार्ज दिला जातो याकडे आयुक्तांनी लक्ष दिले पाहिजे. सगळे अधिकारी महापालिकेचे आहेत त्यांना प्रत्येकाना एक-एक डिपार्टमेंट दिले पाहिजे. एकाच अधिका-याकडे बरेचसे काम दिले जाते त्यामध्ये दुरुस्ती केली पाहिजे. जी.बी.ला ब-याचशा पॅावर आहेत ज्या आम्ही आजपर्यंत वापरलेल्या नाहीत आणि आज सूध्दा बोलण्याची इच्छा नाही. ज्यावेळेला नगरसेवक अधिका-याबद्यल नेमणूकीच्या संदर्भात सांगत असतील त्यावेळेस आपण देखील त्याच्यामध्ये जाणीवपुर्वक लक्ष घालून काम केले पाहिजे. कायदयाप्रमाणे जीबी ची ब-याचशा गोष्टीला मान्यता घ्यावी लागते ती आजपर्यंत आयुक्तांनी घेतलेली नाही. नगरसेवकांचा मानसन्मान ठेवणार नसालतर निश्चितपणे याच्यापुढे जे नियम आहेत

त्यावर बोट ठेवून काम करावे लागेल. बजेटमध्ये कुठल्याही प्रकारची दुरुस्ती सुचवू नये किंवा उपसूचना घेवू नयेत. ब-याचशा सदस्यांनी बरेचसे विषय मांडलेले आहेत. आपल्या महापालिकेचे हित लक्षात घेवून आपल्या महापालिकेचा फायदा होत असेलतर त्यावेळेला त्या अधिका-यांनी सुध्दा आयुक्त जे सांगतील त्याचा निश्चितपणे गांभीर्याने विचार करावा ज्या ज्या वेळेस जीबीमध्ये सदस्य प्रश्न मांडत असतात किंवा आरोप करत असतात ते पुराव्यानिशी असतात बजेटची मिटिंग असल्यामुळे हा विषय घेणे उचित नाही परंतू यावर प्रशासनाने गांभीर्याने घ्यावे आणि कोणी दोषी आढळून आलेतर त्याच्यावर योग्य ती कार्यवाही करावी. महापौरांना एवढीच विनंती करतो की बजेटच्या मिटिंगमध्ये उपसूचना घ्यायच्या नसल्यातरी जे आवश्यक असेल अशा उपसूचना तुमच्याकडे घ्याव्यात व नंतर त्यापैकी ज्या महापालिकेच्या हिताच्या असतील किंवा फायदयाच्या असतील त्या स्विकाराव्यात.

मा.तुकाराम भोंडवे :- मा.महापौर साहेब, ग्रामीण भागासाठी या बजेटमध्ये भरीव तरतूद केलेली नाही. ग्रामीण भागात दोन गावाला जोडणा-या रस्त्यासाठी १ कोटी दिलेले आहेत मला वाटत नाही तो रस्ता होईल. नव्याने समाविष्ट झालेली गावे आहेत त्यांच्याकडे ग्रामपंचायत असताना भरपूर महसूल यायचा ते सूखी असायचे. त्याठिकाणी अजून सुध्दा पाईप किंवा चार मुरुमाच्या गाडया टाकलेल्या नाहीत एवढी दुर्दैवाची बाब आहे. काही ठिकाणी खुप मोठी उधळपट्टी होते. बंद पाईपलाईनच्या माध्यमातून तीन ते चार लाख दंड भरावा लागला, कारण त्याठिकाणी कोणी मन लावून काम करत नाहीत. त्याठिकाणी गेलेतर तेथील शेतका-यांना निश्चित जाण आहे, आपले अधिकारी त्याठिकाणी जात नाहीत. महापालिका हद्दीतील जो भाग आहे तो अजूनही कामाच्या बाबतीत ठप्प आहे. ज्याठिकाणी आपली उधळपट्टी चालली आहे ती खुपच चालली आहे. आपण शासनाला पवना डॅमच्या पाण्यासाठी २२ कोटी देतो. पाऊस काळामध्ये चार-सहा महिने पाणी घ्यावे लागत नाही. डोंगरमाथ्यावरुन पाणी येते त्या चार सहा महिने आपण शासनाला फुकट पाणीपट्टी देतो. पुर्वी महापालिका श्रीमंत होती. “श्रीमंती आलीतर माजू नका आणि गरीबी आलीतर लाजू नका ” असे आहे तरी हे थांबले पाहिजे. याठिकाणचा अनाठायी खर्च देतो. आरोग्याच्या बाबतीत सांगायचे झालेतर तेथील कर्मचा-याच्या पदरात ५० ते ६० रुपये पडतात. ग्रामीण भागाच्या तोंडचे पाणी पुसणारे हे आहे. आमच्या नशिबी दुजाभाव येतो असे आम्हांला वाटते. पवना डॅमच्या बाबतीत जेवढे वाचविता येईल तेवढे वाचवावे. आपण चार महिने त्यांना फुकट पैसे देतो ते वाचलेतर महापालिकेला फायदा होईल. एक रोड एक कोटीमध्ये होणार नाही. मुंबईला जातानाचा रावेत ते किवळे हा रोड सुध्दा यामध्ये होणार नाही. उपसूचना द्यायच्या नाहीत म्हणजे तोंड बंद करुन बुक्क्यांचा मार खावा लागतो. एखादा अधिकारी याठिकाणी महापालिकेचा जावई असतो असे म्हणलेतर वावगे ठरणार नाही अशा जावाईपणात कोणी असेलतर त्यांना सुध्दा तुम्ही सांगावे. समाविष्ठ झालेले

ताथवडे गाव इच्छा नसताना घेतलेले आहे. त्यांना रस्ते,पाण्याची व्यवस्था करावी. बंद पाईप योजनेसाठी चांगले अधिकारी नेमावेत. त्याठिकाणचा रोज चार ते पाच लाख दंड पडतो तो बंद केलातर हा दंडतरी पडणार नाही. कागदी घोडे नाचविण्याचे काम चाललेले आहे याकडे लक्ष घालावे.

मा.अलकाताई यादव :- मा.महापौर साहेब, मला एवढेच सांगायचे आहे की ग्रामीण भागावर जो अन्याय झालेला आहे तो दुर करावा. सोलापूर पॅटर्न पध्दतीने मंजूरी झालेली आहे त्याप्रमाणे करावे. पाणीपट्टी वसुली करा,घरपट्टी वसूली करा परंतु पोटभर पाणी दया.

मा.उषा ढोरे :- मा.महापौर साहेब, मी बजेटचे मनपुर्वक स्वागत करते बजेटवर जास्त बोलणार नाही परंतू निदान वर्षाची आठवण म्हणून आम्ही थोडेसे बोलणार आहोत. आयुक्त साहेब, आपण ज्यावेळेला आमच्या समोर घरपट्टीमध्ये वाढ करावी त्याचप्रमाणे पाणीपट्टीमध्ये वाढ करावी अशी विनंती केली तेंव्हा आम्ही सुध्दा माणुसकी खातर आपल्याला सहकार्य केलेले आहे. सहकार्य केल्यानंतर त्याचा चांगल्याप्रकारे फायदा व्हायला पाहिजे होता. त्याठिकाणी आमच्या सभासदांना आणि नागरीकांना अतीशय धोक्यात टाकून दिलेले आहे. पाणीपट्टीमध्ये नागरीकांना वाटले जेवढे पाणी वापरु तेवढे बील येईल व आमचा आर्थिक फायदा होईल. त्याचप्रमाणे घरपट्टीमध्ये सुध्दा आपण तसे केलेले आहे. सगळयांच्या उपयोगात येईल असे प्रोजेक्ट करावेत. या शहरात आल्यानंतर शहरीपणा बिलकूल जाणवत नाही असे बंड साहेब म्हणत होते. तीच परिस्थिती आता झालेली आहे. मेन रस्त्याने चाललेतर त्याठिकाणी ब-यापैकी रस्ते असतात परंतु आजुबाजूच्या गल्लीमध्ये गेलेतर नागरीकांना त्रास झाल्याशिवाय राहणार नाही असे रस्ते आहेत. नगरसेवकांना वॉर्डामध्ये फिरावे लागते त्या वेळेस त्या नगरसेवकांना नागरीक विचारतात याठिकाणी खड्डे आहेत, पाणी कमी आलेले आहे,पाणीपट्टी जास्त आलेली आहे,कर वाढलेला आहे तेच प्रश्न आम्हांला सांगत असतात. ते म्हणत नाहीत तुम्ही एवढे मोठे वायसीएम का बांधले आहे, मोठमोठे प्राजेक्ट का राबविले आहेत,ते नाकारु शकत नाहीत कारण त्याचा फायदा सगळयांना असतो. आपण उड्डाणपुल केलेले आहेत ते लोंकासाठी केले आहेत परंतु चांगले प्रोजेक्ट करत असताना आता सांगीतल्याप्रमाणे खादी कपडे घालून वॉर्डातील हॉटेलमध्ये चहा पिण्यासाठी जातात हे खरे आहे. आम्ही नगरसेवक निवडून आल्यानंतर आमच्याकडून नागरीकांच्या ज्या अपेक्षा असतात त्या पुर्ण करण्याकरिता आपल्याला आम्ही सांगत असतो. पाणी वेळेत आणि चांगले द्यावे, रस्ते चांगले करावेत. परंतु या अपेक्षाचा भंग होत चाललेला आहे लोप होत चाललेला आहे. मीटर बसविल्यानंतर पाण्याचा गैरवापर थांबेल असे वाटले परंतु थांबलेला नाही. करसंकलन विभागामध्ये कोणाकोणाचे घर आहेत त्याप्रमाणे त्यांच्याकडून लिस्ट घेवून पाण्याचे मीटर बसविले असतेतर अशी परिस्थिती आली नसती. अंडरग्राऊंड ड्रेनेजच्या मेनटेनन्सचे काम पाच

वर्षे ठेकेदार करतात तशा पध्दतीने मीटरचे काम सुध्दा ठेकेदाराकडे दिले पाहिजे. एक मिटर निरीक्षक तीन ते चार हजार मीटरची पाहणी करु शकतो. जे कर्मचारी आहेत त्यातील किती कर्मचारी व्यवस्थीत काम करतात. मीटर पध्दत चांगली राबवावी. तुम्ही पेपरला जाहिरात द्यावी,आपण कोणत्यातरी साप्ताहीक पेपरला जाहिरात देतो ते आम्हांला सुध्दा माहित होत नाही. नागरीकांना कसे काय माहिती व्हायचे व त्यांनी कसे अर्ज करायचे. हे मीटर ज्या ठेकेदारांनी बसविलेले आहेत त्यांनीच जे मिटर चांगले नाहीत ते फ्रि मध्ये बसवायला पाहिजेत. गुंठेवारी पध्दत शासनाच्या मुदतीप्रमाणे चालू होती, अजून चालू आहे त्यात गॅप पडलेला नाही. आपण घर चालविताना आपल्याला माहिती असते घरामध्ये किती माणसे आहेत किती वाढलेली आहेत त्याप्रमाणे नियोजन करतो तसे शहराची लोकसंख्या वाढलेली आहे त्याप्रमाणे करावे. पुढच्यावेळेस आम्ही महिला याठिकाणी ५० टक्के बसणार आहोत. आरोग्याबद्यल बोलायचे झालेतर माझ्या वॉर्डामध्ये प्रसुतीगृह आहे ते ३५ ते ४० खाटाचे आहे त्याठिकाणी एक ॲम्ब्युलन्स असायला पाहिजे मी मागणी सुध्दा केलेली होती. एखादी महिला त्याठिकाणी आलीतर तीला रिक्षा दाखविली जाते, ती महिला रिक्षामध्ये जाऊ शकते का. रस्त्यामध्ये तीला त्रास होत असेलतर काय परिस्थिती होईल. तरी अशाठिकाणी ॲम्ब्युलन्सची सोय करणे आवश्यक आहे. कच-यासाठी घंटागाडीची सोय केलेली आहे. आपल्याला जमत नसेलतर कुठलेही फॅड काढू नये. सवयीचा परिणाम प्रत्येकामध्ये असतो. कचरा हा सात-आठ दिवस उचलला जात नाही. गाडया चेकिंगसाठी कार्यशाळेमध्ये पाठविल्या जातात,माणसे नसतात. शहराला चांगली सवय लावावी आम्हांला सुध्दा कचरा नेऊन टाकता येतो. आरोग्याच्या लोकांच्या अडचणी समजावून घ्याव्यात आणि आपल्या शहराला जो बकालपणा येतो आहे त्याकडे लक्ष द्यावे. बांधकाम चालू असल्यानंतर आपल्या कामगाराकडे जो नागरीक जाईल त्याची नोंद पटकन होत असते. ज्यावेळेस या नोंदी होतात त्यावेळेस आपल्या मनपाला त्याचा फटका बसतो कारण एक हजार स्क्वे.फुटाचे बांधकाम असेलतर ८०० स्क्वे.फुट बांधकाम दाखविले जाते हा मनमानी कारभार चाललेला आहे. कुठेही ऑफिसमध्ये टेबलावर लोक नसतात. पाणीपट्टी भरायची म्हणलेतर ड प्रभागामध्ये लोकांना जावे लागते. चारआण्याची कोंबडी आणि बारआण्याचा मसाला असे झालेले आहे. ठेकेदारी पध्दतीने स्वच्छतेचे काम दिलेले आहे ते लोक १४० लोकांची हजेरी लावतात आणि जागेवर ३९ लोक असतात हे बरोबर आहे. त्याठिकाणी काम करणा-या महिलांना ठेकेदार राबवून घेतात. परमनन्ट लोकांनी काम करायला नको का. ठेकेदारांच्या महिलांना १९०० रुपये आणि परमनन्ट लोकांना २१ हजार पगार आहे. आमच्या भावना विचारात घ्याव्यात. विदयूत विभागावर बोलायचे म्हणलेतर त्या विभागाच्या तक्रारी नसतात ते काम ताबडतोब करतात परंतु खुप गल्लीमध्ये जायचे म्हणलेतर त्याठिकाणी पोल उभे करण्यास अडचणी येतात. त्याठिकाणी लाईट कशी देता येईल, उंच पोल कसे देता येतील हे बघावे. महिला भगिनीनी अनुदान घेतल्यानंतर त्या वाटून घेतात असे आता सांगीतले, घेवू दया महापालिका बचत गटाना अनुदान देते. पाळणाघरासाठी बचत गटांचे अर्ज आहेत ते

पुर्ण शहरात केलेतर चांगले होईल. कुठल्याही आईला आपले बाळ जवळच असावे असे वाटते. प्रत्येक गावामध्ये महापालिकेचे पाळणाघर केलेतर चांगले होईल. पुन्हा एकदा अभिनंदन करते आणि बजेटला मंजूरी द्यावे असे सांगते.

मा.महापौर :- सर्व सन्मा.सदस्य आपल्याला विनंती करण्यात येते की आपण बजेटवर बोलावे. बजेट सोडून जी.बी. सारख्या आपण तक्रारी करतो आहोत उपसूचना घेणार नाहीत. एखादया कामाचे प्रयोजन केलेले नाही,अत्यंत महत्वाचे काम आहे व अर्थसंकल्पामध्ये आयुक्त साहेबांनी त्यासाठी तरतूद केलेली नाही असे असेलतर ते निदर्शनास आणून द्यावे किंवा एखादे काम नको आहे आणि त्यावर खर्च होतो आहे अशा आपल्या मौलीक सूचना असतीलतर त्या कराव्यात. मोजके आणि व्यवस्थीत असे बोलावे.

मा.डॉ.मीना पाटिल :- मा.महापौर साहेब, बजेट मांडायच्या अगोदर ॲटोक्लस्टरला मिटिंग झाली होती तेथे प्रत्येक वॉर्डासाठी २ कोटी देण्यात येतील असे सांगण्यात आले त्यावेळेला वाटले की माझ्या वॉर्डातील किंवा ग्रामीण भागातील रस्ते गुळगूळीत दिसायला लागतील. बजेटचे पुस्तक वाचल्यानंतर असे समजले की मागची बीले
येणा-या बजेटमधून देण्यात येतील. २० लाखाचा निधी रस्त्यासाठी शिल्लक राहिलेला आहे त्यामध्ये कोणते रस्ते पुर्ण होतील. ग्रामीण भागामध्ये २० लाखाचे बजेट दिलेतर त्यात एखादा रस्तातरी होईल का हे सांगावे. आपण २० लाखात रस्ता केलातर अभिनंदन करेल. क-प्रभागाचे डांबरीकरणाचे काम होते त्यामध्ये सांगण्यात येते जे रस्ते तुम्हांला कागदोपत्री करायला लावले तेच रस्ते करायचे अन्यथा तुमच्या ठेकेदाराला बिलोमध्ये काम करावे लागेल. असे करायचे असेलतर आयुक्त काय निर्णय घेणार आहेत हे सांगावे. ग्रामीण भागामध्ये प्रत्येक ठिकाणी एक तास पाणी येते माझ्या भागामध्ये ५० टक्के मिटर बसवून झालेले आहेत. प्रभाग अधिका-यांकडे मिटर बसवितेवेळेस वेळोवेळी फोन केलेले आहेत. प्रत्येक घरामध्ये बसवावेत म्हणून सांगीतले आहे. त्यावेळेला कामचुकारपणा करुन ते लोक पळून गेले. १२७५/- रेग्यूलर बील येते. माझ्या वॉर्डात ज्यांना मीटर बसविले नाहीत त्यांना २८००/- रुपये बील आलेले आहे. तुम्ही मीटर प्रमाणे बील घ्यावे घरात जावून किती पाणी येते हे मोजावे ग्रामीण भागातील लोकांना न्याय देण्याचा प्रयत्न करावा, बील भरताना तळतळ वाटते. उत्तर दिले जातात की पेपरला ॲड दिली होती. कर वसुल करताना जसे भोंगे लावून सांगीतले जाते तशी पध्दत मीटर लावताना का अवलंबीली नाही. ग्रामीण भागातील नागरीक १८ तास काम करत असतीलतर त्यांनी पेपर कधी वाचायचा. आमच्या भागातील लोकांना मीटर फुकट बसवून दिले पाहिजेत. तसे केलेतर आयुक्त, महापौरांचा सत्कार करु. त्याचप्रमाणे आमच्या भागातील गुंठेवारीचा महापालिकेला सोर्स पाहिजे असेलतर पुन्हा गुंठेवारी चालू केलीतर तो नवीन सोर्स होईल. रुग्णांच्या बाबतीत ज्या ज्या वेळेस फोन करतो त्या त्या वेळेस आयसीयू मध्ये जागा शिल्लक नाही

असे सांगीतले जाते. तरी आयसीयूचे विस्तारीकरण करुन त्याची संख्या वाढवावी तातडीच्या कामासाठी जसा महापौर निधी असतो तसा आयुक्त निधी तयार करावा आणि ग्रामीण भागातील रस्ते करुन द्यावेत.

मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, नगरसेवकांमध्ये एक टक्का सुध्दा उत्साह आहे असे दिसत नाही. आज अशी परिस्थिती झालेली आहे तुम्ही दिलेले बजेट स्थायी समितीला सादर करायचे ते सभागृहामध्ये येणार व आहे तसे बजेट उपसूचना न देता मंजूर होणार, मग बोलायचे कशाला. बजेटमध्ये तुम्हांला वाटल्या त्याच गोष्टी टाकलेल्या आहेत व त्याच गोष्टी मंजूर होणार आहेत. एखादी सूचना करायची ठरविलेतर, कुठल्याही ठिकाणी बदल करायचा असेलतर तो बदल करता येत नाही, मग या बजेटवर कोण चर्चा करणार. बजेटमध्ये नेमके काय आहे आपल्याकडे असलेले पैसे, जादाचा होणारा खर्च आणि जादा खर्च होणार असेलतर तो कुठून केला पाहिजे त्याचा ताळमेळ बसायला पाहिजे. महापालिका उत्पन्नाचे साधन वाढवित नाही किंवा असलेले काम जबाबदारीने करत नाहीत. आज १५ लाख लोकसंख्या असलेल्या पिंपरी चिंचवड शहराला बर्नवॉर्ड का करु शकत नाहीत. एखादी दुर्घटना घडलीतर पुण्यात जाईपर्यंत माणसाचा जीव जातो. आपण स्वाईन फ्ल्यूचे दहा बेड वाढवू शकत नाहीत का. पुण्यामध्ये रुग्णाला नेईपर्यंत जीव जातो आपल्या पिंपरी चिंचवड शहराची जबाबदारी दुस-या शहरावर सोपवणार का. बीव्हीजी बद्यल बोलते काही ठिकाणी उदयान बनविलेली आहेत, महापालिकेला त्यांनी पैसे द्यावेत व त्यांच्याकडे जे लोक आहेत त्यांनी ते चालवावे अशा पध्दतीने करावे जेणेकरुन आपल्यावर जबाबदारी राहणार नाही आणि महापालिकेला उत्पन्नही मिळेल, अशा पध्दतीने उदयाने दिलीतर चांगले होईल.सिक्यूरिटीसाठी आपण पेमेंट देतो. काही सिक्यूरीटीला ऐकू येत नाही तर काही सिक्यूरीटीला बोलता येत नाही असे लोक त्याठिकाणी भरलेले आहेत तो माणूस चप्पल घालून लॉनवर फिरत होता. पुर्वी आपण घंटागाडीवाल्यांना घेतले, शिक्षणमंडळात घेतले,आता वायसीएममध्ये लोक घेतले आहेत. आपण सहा-सहा महिने मानधनावर म्हणतो पण पाच-पाच वर्षे ते असतात त्यांचा सहानुभूतीपुर्वक विचार झाला पाहिजे. तूमच्या डोक्याला त्रास करायचा नसेलतर कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने घ्या सिनीअर लोकांनी बोलणे योग्य नाही, आयुक्तांना नेहमी सांगत असते ज्या दिवशी आम्ही बोलतो त्याच दिवशी सफाई व्यवस्थीत होते परत आहे ती परिस्थिती राहते. आपण वाचनालय दिलेले आहेत, व्यायामशाळा दिलेल्या आहेत, गार्डन दिलेले आहेत त्या पध्दतीने दयावे जेणेकरुन तुमच्यावरचा बोजा कमी होईल व व्यवस्थीत चालले का नाही हे बघण्यासाठी त्यावर चांगल्या पध्दतीचे सुपरवायझर नेमावेत. प्राधिकरणामध्ये मैत्री म्हणून लायब्ररी आहे ती सुध्दा चांगली आहे तशा इतरही लायब्र-या राबवाव्यात तेथे मेडीकलची पुस्तके, सीईटीची पुस्तके मुलांना दिलेली आहेत का. परिक्षा झाल्यानंतर सीईटीची पुस्तके दिलीतर त्याचा मुलांना उपयोग होत नाही. लायब्र-या व्यवस्थीत पाहिजेत. माझ्याकडची एक नंबरची लायब्ररी होती, आम्ही स्वत: लायब्ररी चांगली करुन घेतलेली आहे. ज्या

बेसीक गोष्टी आहेत त्या व्यवस्थीत केल्या पाहिजेत. जे लोक टॅक्स भरतात त्यांच्या दारासमोर ब्लॉक बसवू शकत नाहीत, जे लोक प्रामाणिकपणे टॅक्स भरतात त्यांचे डांबरीकरण करुन देवू शकत नाहीत  शहरात सगळी कडे काम व्हायला पाहिजे बेसीक कामे झाली पाहिजेत. महिला व बालकल्याण योजनासाठी २१ कोटीची तरतूद केलेली आहे. चारही प्रभागामध्ये महिलांना शिकविण्यासाठी वर्कशॉप आहेत, आम्हांला माहिती आहे त्याठिकाणी कोणते कोर्सेस आहेत. महापालिका डिटीपी टॅली कोर्स शिकविणार आहे म्हणून सगळयांनी रेशनींग कार्ड, फोटो जमा केले परंतु हे मुलांना शिकविले जाते महिलाना शिकविले जात नाही त्यांनाही शिकवायला पाहिजे. महिलांना सक्षम करायचे असेलतर आपल्याकडे २१ कोटीची बजेटमध्ये तरतूद केलेली आहे. आपल्यासारखे महिला व बालकल्याणवर कोणत्याही महापालिकेचे बजेट नाही. खरोखर ज्या महिला त्यामध्ये सहभागी होणार असतील त्यांना सहकार्य करावे. ठिकठिकाणी वर्कशॉप करावेत महापालिकेच्या वतीने कोर्सेस चालू करावेत जेणेकरुन महिलांना बाजारपेठेत चांगला उपयोग होईल. आमच्या येथे मिटर बसवावेत म्हणून २००७ ला अर्ज अ-प्रभागामध्ये दिलेले आहेत. त्यांची दखल कोणीही घेत नाही. बील सरासरी का दिले असे विचारलेतर सांगतात तुम्ही मिटर बसवून का घेतले नाही. मिटर बसविण्याचे ठेकेदाराचे काम होते. त्यावेळेला नागरीकांनी विरोध केला असे सांगतात, विरोध का केला तुम्ही त्यांच्यावर केस करायची. महापालिकेमध्ये येवून कोणीही नागरीक म्हणणार नाही की १४००/- रुपये घेवून मिटर बसवावा ती त्या एजन्सीची जबाबदारी आहे. आपण जे पत्रक छापतो ते सुध्दा नगरसेवकांच्या टेबलावर,महापालिकेच्या टेबलावर राहतात. ११ वाजता एखादा कार्यक्रम असेलतर ते संध्याकाळी ६ वाजता पत्रिका मिळतात. काम सुरु होण्या अगोदर अधिकारी सगळया गोष्टी बोलतात तरच फाईल पुढे जाते आणि वर्कऑर्डर मिळते. राजू मिसाळ यांच्या वॉर्डातील जी योजना आहे ती पुर्णत्वास आलेली नाही. रोप-वे करण्यासाठी आपण तेथे प्रयत्न करत होतो. दुर्गादेवी टेकडीच्या तेथे जागा आहे ते का होत नाही. महापौर साहेब, आणि आयुक्त साहेब तुम्हां दोघांचीही तारेवरची कसरत आहे. डियर पार्क सुध्दा बीओटीवर दयावा. ज्यावर आपण करोडो रुपये खर्च करणार आहोत त्या योजना बीओटीवर द्याव्यात. चांगल्या पध्दतीचे प्रोजेक्ट शहरामध्ये पुर्ण व्हायला पाहिजेत आणि लोकांना सुविधा मिळायला पाहिजेत. चांगल्या पध्दतीने कामे व्हावीत.

मा.ज्योती भारती :- मा.महापौर साहेब,  बजेटवर चर्चा करताना महीलांना प्राधान्य दिले पाहीजे. महापौरांनी महिलांना प्राधान्य दिल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करते. आम्ही सर्व नगरसेवक नाराज आहोत. माझ्या वॉर्डात आयुक्त साहेबांनी व्हिजिट दिली त्याला कमीत कमी एक महिना झाला. त्यावेळी ऑर्डर असून, तरतूद असून सुद्धा आजपर्यंत माझ्या वॉर्डात डांबरीकरण झालेले नाही. रस्त्याची दुरावस्था  तुम्ही तुमच्या डोळ्यांनी पाहिली आहे. तिथे दररोज अपघात होत आहेत. माझ्या वॉर्डात खूप प्रॉब्लेम आहेत. पाणी मीटर बिलांबद्दल खूप तक्रारी आहेत. काळेवाडीतील मनपा शाळा स्थलांतरीत

झाली असून शाळेचे काम सुरु झालेले आहे. तरी याठिकाणी महिलांसाठी व्यायामशाळा व सांस्कृतिक भवन बांधावे. राज्यसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण मंजूर झाले आहे. वॉर्डात महिलांना प्राधान्य देऊन कामे पूर्ण करावीत.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, हे बजेट म्हणजे चतुर महापौरांच्या काळातले चतुर बजेट असे म्हणावे लागेल. दशक्रिया विधीच्या वेळी प्रवचन करणारा त्याचे कर्तव्य करत असतो,ऐकणारे ऐकत असतात. कोणी मर्जीने येत नाही. प्रशासनाने प्रवचन पूर्ण ऐकायचे ही प्रथा झाली आहे. बजेटच्या माध्यमातून या पार्श्वभूमीवर खरेतर चुकीची पद्धत पडली आहे. मी आयुक्त साहेब शर्मा यांना गृहीत धरुन बोलत नाही. मागील चुकांचे प्रायश्चित्त त्यांना करावे लागते आहे. मागील वर्षी कालावधी कमी होता त्यावेळी मी, पक्षनेत्यांनी प्रत्येकाला कळवले होते की, बजेट मंजूर करायचे आहे, उपसूचना देऊ नका. बजेटचा अर्थ काय? एखाद्या कुटुंबाचे वर्षभराचे नियोजन असते, घर कसे चालवायचे, खर्च कसा टाळायचा. विश्वस्त म्हणून नागरिकांच्या वतीने काही सूचना, हरकती राहील्या असतील तर त्या घेऊन बजेट केलेतर ते परिपूर्ण होते. मागील सर्व चुकांची पुनरावृत्ती न करता त्याचा पश्चात्ताप करुन सर्व कामांच्या माध्यमातून भविष्याची वाटचाल अंध:कारातून करुन कायद्यात तरतूद म्हणून बजेट करणे असे या बजेटचे स्वरुप आहे. या पार्श्वभूमीवर याचा निश्चित निषेध करतो. काहींच्या वर्कऑर्डर दिल्या होत्या. त्यांची देखील इथे तरतूद केलेली नाही. वर्षभर वाट बघून कदाचित पुढील वर्ष येईल अशी परिस्थिती निर्माण केली आहे. फक्त संस्था आमची आहे म्हणून आकडेवारीच्या रुपात बोलणार होतो. आमच्या हक्क असताना मिळवू शकत नाही. हे दुर्देव घेऊन सभागृहातून बाहेर पडणार आहोत. सर्वजण याला जबाबदार आहेत असे नाही. मा.आर.एस.कुमार यांच्यासारखा ज्येष्ठ नगरसेवक काम करतो, खंत व्यक्त करतो. त्यावेळी सहजतेने घेतले जाते. भाषणात आम्ही प्रत्येकजण आपआपल्या पद्धतीने चांगले बोलत असतो. आकडेवारीचा ऊहापोह करुन बोललो म्हणजे चांगले बोललो, बाकीचे बोलले ते काहीच बोलले नाहीत असे नसते. त्यांच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या. दोन वर्षांचा कालावधी सेन्सिटीव्ह आहे. यापेक्षा दुर्दैवी अवस्था पुढील बजेटची असणार आहे. या बजेटच्या माध्यमातून मतप्रदर्शन करणार आहे. छोट्या-छोट्या गोष्टींकडे दुर्लक्ष होते आहे. जे.एन.एन.यू.आर.एम. च्या माध्यमातून रकमा येतात. सगळ्यांचा लाभ लपलेला आहे. कोटींत बोलायचो आज लाखांत बोलत आहोत. ही आज अवस्था आहे. छोटया-छोट्या गोष्टींतून उत्पन्न वाढवले तरी पुढील बजेटमध्ये किमान ५ लाखांचे मंजूरीचे प्रस्ताव घ्याल अशी अपेक्षा व्यक्त करतो. जेव्हा १०० कोटी अपेक्षित खर्च धरला जातो तेंव्हा ते सगळे खर्च होतील अशी अपेक्षा असते. महापौर इथे बसले असते तर त्यांनी सुद्धा हीच अपेक्षा व्यक्त केली असती. खर्चाच्या बाजुने बघतो, तसे जमेच्या बाजुने देखील बघा. आजही छोट्या-छोट्या गोष्टींकडे लक्ष नाही. मूलभूत करात लक्ष द्यावे. पाणीपट्टीकडे लक्ष देतो कारण कर्ज घेण्याची वेळ येऊन ठेपली आहे. जकात उत्पन्न कमी होत चालले आहे.

सुनामीप्रमाणे गत आलेली आहे. सुनामी आल्यावर सगळे सैरावैरा पळतात. प्रशासन कर्तृत्ववान झाले आहे. गतिमान विकासाचे बक्षिस मिळाले आहे. गतिमान उत्पन्नाचे बक्षिस मिळवायचे आहे. मनपाच्या इमारती, शाळा,मैदाने भाडेतत्वावर दिलेल्या आहेत. याचे नेमके प्रमाण किती, यातून किती भाडे वसूल करतो, याकडे भविष्यात लक्ष देणे गरजेचे आहे. भाजी मंडईत मनपाने गाळे बांधले आहेत. थकबाकी आहे. पण त्यांच्याकडून वसूल करण्याची हिंमत नाही. गुंठेवारी शुल्क जमा झालेले नाही. काम ठप्प पडलेले आहे. गांभिर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. शहरात केबलचा सुळसुळाट आहे. केबल टि.व्ही. व्यावसायिकांकडून शुल्क घेतल्यास त्यातून उत्पन्न मिळू शकेल. रितसर जागेवर जाऊन डायरेक्ट दाखवेल की केबलसाठी पोलचा वापर केला जातो. १८ कि.मी. साठी १० लाख इतका दर आहे. कितीतरी कि.मी. केबल वायरी बंद गटारांतून गेल्या आहेत. यातून उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाही. मी तुम्हाला पुराव्यासहीत दाखवेल. पार्कींगच्या जागा बारकाईने निश्चित करा. कुठला कोण, कुठून केबल लावतो यातून सुद्धा भाडे वसूली करा. थकबाकी असताना वसूल करण्याच्या दृष्टीकोणातून निर्णय घेत नाहीत. अप्पूघर थकबाकी, मनपा मालमत्ता थकबाकी यासाठी कमिटी करा. केबलची रक्कम घेऊन जाणाऱ्यांना शिक्षा करा. आपल्या अधिकाऱ्यांना कळवल्यावर त्यांनी आरामशीर सहा महिन्यांनी केबल तोडली. आज हे सांगत असताना याची किती अंमलबजावणी होणार आहे. आपण फर्नीचर करतो. जुन्या मालाचा लिलाव करतो. दर वर्षी लिलाव केला पाहीजे. कोट्यावधी किंमतीच्या मालाचा लिलाव ३ वर्षांनी करतो त्यावेळी तो भंगारमध्ये मोडला जातो, दीड लाखाच्या मालाची किंमत वीस हजार धरली जाते. नियोजन करणे गरजेचे आहे. करसंकलनने वाढीव बांधकामे, नवीन मिळकती धरुन आकारणी करणे गरजेचे आहे. मिळकतींची अंतिम आकारणी झालेली नाही. मिळकती बदलून घेणाऱ्यांचा पाठपुरावा केला तर तुम्हाला उपयोगी ठरेल. नवीन प्रोजेक्ट करु नका झालेले निस्तरा. बजेटवर बोलताना उपसूचना देऊन बोलण्यात मजा असते. संस्थेला डोळ्यासमोर ठेवून काम करायचे आहे. नवीन समाविष्ट गावांमध्ये घरपट्टीच्या माध्यमातून उत्पन्न निर्माण झाले आहे. त्यांची अपेक्षा आहे ५० टक्के सवलत द्यावी. शासन दरबारी सर्वांनी मनापासून पाठपुरावा करणे गरजेचे आहे. त्याच पद्धतीने विकास कामे केली जातील. नवीन गावे घेणे,वगळणे याबाबत ठाम निर्णय घेणे गरजेचे आहे. पाणीपट्टी, घरपट्टी वसूल केलीतरी उत्पन्नाचे नवीन स्त्रोत्र मिळेल. जकात या माध्यमातून प्रचंड प्रमाणात थकबाकी आहे. कोणतेच नियोजन नाही. बारकाईने लक्ष देणे गरजेचे आहे. जकातीमध्ये कंपन्यांना सवलत द्यायला पाहीजे. बऱ्याच कंपन्यांचे चाकण, रांजणगाव इथे स्थलांतर व्हायला लागले आहे. शहर अद्ययावत असताना देखील कंपन्या शहर सोडून जातात. त्यांना जाचक अटी मान्य नाहीत. नवीन जमेची बाजू पाहत असताना येणारा काळ मोठा आव्हानात्मक आहे. प्रचंड स्पर्धा वाढली आहे. चाकणला कंपन्या जातात. त्यांच्या जीवावर मनपाचे उत्पन्नाचे साधन आहे. त्या उठून कधी जातात ते कळत नाही. निर्णायक ठाम भूमिका घेतली पाहीजे. प्राधिकरणाच्या हद्दीत रोड,ड्रेनेज,पाणी पाईपलाईन,विद्युत इ. सुविधांची कामे करतो. त्याबद्दल त्यांना

आपल्याला पेमेंट द्यावे लागत नाही, प्राधिकरणातील एखाद्या भागाचा विकास करताना त्यांनी साधा रोड करायचा, आपण पक्का रोड करायचा, त्यांनी मात्र पूर्ण रक्कम घ्यायची असे आहे पाणीपट्टी मीटरची किंमत वसुल करतात. पाण्याच्या मीटरची व्यवस्था करणे गरजेचे आहे. चुकीचे काम झाले आहे. देशात मीटर पद्धत लागू होत असेल तर आपल्याकडे सुद्धा व्हायला पाहीजे. कोणतीही नवीन गोष्ट किंवा पद्धत पाडण्यासाठी आधी त्याचा चांगला रिझल्ट पहा, नंतर ती पद्धत पाडायला पाहीजे. पाण्याच्या मीटरसाठी रकमेचीसुद्धा व्यवस्था करणे गरजेचे आहे. शासनाकडून अनुदाने मिळतात. डी.पी.च्या माध्यमातून नियोजन करत असतात. महाराष्ट्र शासनाची किंवा केंद्र शासनाची क्रिडा किंवा अन्य विभागांची कोट्यावधी रुपयांची अनुदाने धूळखात पडून असतात. आपल्या अधिकाऱ्यांनी कधीही अनुदाने आणण्याचा प्रयत्न केलेला नाही. त्यासाठी तुम्ही प्रयत्न करा. पाठपुरावा करण्यासाठी ५ कोटी अनुदान आणण्यासाठी ५ लाख खर्च करा. त्यांना पंचतारांकीत हॉटेलमध्ये ठेवा, त्यांना पळवा. मनपाचे हित डोळ्यासमोर ठेवून निर्णायक भूमिका घेतली तरच भविष्यात बजेटवर बोलायला विषय तरी शिल्लक राहतील. जे.एन.एन.यू.आर.एम. अंतर्गत सुधारणा करताना वैद्यकीय उपचारांसाठी सवलतींसाठी मनपाचा निधी कमी असेल तर त्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. वाय.सी.एम.मध्ये कोणीही या, कसेही या, असे आहे कठोर निर्णय घेतले पाहिजेत १०० कोटी कर्ज घेत असताना नियोजन करणे गरजेचे आहे. खर्च कसा होतो- या पार्श्वभूमीवर आपल्या कामगारांच्याबाबतीत पिंपरी चिंचवड महापालिकेचे मनमोकळे धोरण असते. कष्टकऱ्यांना त्यांचा लाभ निश्चित मिळाला पाहीजे. परंतू त्यावर आपले नियंत्रण पाहिजे. सहावा वेतन आयोग लागू करताना १०% वेतनासह वेतनश्रेणीत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. २५% तरी कामगार काम करत आहेत का याचा शोध घेणे अत्यंत गरजेचे आहे. प्रशासनास सोडुन परस्पर मानधनावर नियुक्त्या होतात, ट्रान्स्फर आदेश काढून नेमणूका करतात. कर्मचाऱ्यांची आवश्यकता नसतानाही त्यांना अतिरिक्त भत्ता दिला जातो. सार्वजनिक सुट्टीच्या दिवसाचा दिड पट पगार दिला जातो. ज्या कर्मचाऱ्यांची आवश्यकता नसते त्यांना सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कामावर थांबवले जाते याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. त्याच्यावर नियंत्रण नसल्यामुळे त्याचा सुळसुळाट झाला आहे. याठिकाणी कोणत्याही परिस्थितीत नियंत्रण करणे गरजेचे आहे. आपण किती लाईटबील भरतो. दुपारीसुद्धा रस्त्यावरील लाईट चालू असतात. रात्र पाळीवर असलेली व्यक्ती त्या बंद करण्याच्या अवस्थेत नसते. ग्रामीण भागात एक تाससुद्धा लाईट नसते. या खर्चावर नियंत्रण करणे अत्यंत गरजेचे आहे. आरोग्य विभाग- औषध फवारणी,वॉर्डातील साफसफाई ठेकेदारी पद्धतीने मोठ्या प्रमाणात करतो. मनपाची मशिनरी खाजगी तत्वावर चालवायला देतो. त्यासाठी भरमसाठ रकमा दिल्या जातात. त्या मशिनरी वापरत नसल्यातरी रकमा दिल्या जातात. यातही एकाच ठेकेदाराला टोटल रक्कम दिली जाते. अशा खर्चाच्या माध्यमातून बजेटवर बोजा पडतो. उद्यान विभाग- रोपे खरेदी, उद्यानांतील खेळणी खरेदीसाठी दरवर्षी तरतूद केली जाते. उद्यानांत अधिकारी खेळणी खेळतात का लहान

मुले खेळतात याची चाचपणी करणे गरजेचे आहे. पाच रुपयाच्या खेळण्याला पन्नास रुपये लावतात. यावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. नाहीतर निश्चितपणे भविष्यात मोठ्या संकटाला सामोरे जावे लागेल. क्रिडा खात्याकरिता बजेटच्या ५% तरतूद केली जाते. सहा ते साडेसहा कोटी तरतूद आहे. महापौर चषकासारख्या मोठ-मोठ्या स्पर्धांवर खर्च केला जातो. क्रिडा स्पर्धांच्या माध्यमातून शहरातील नवोदित खेळाडूंना वाव देता येईल. त्यासाठी नियोजन करुन आराखडा तयार करुन त्यावर २५ कोटी खर्च केले तरी चालेल परंतू समारंभ इ. साठी स्पर्धा थांबवू नयेत. समारंभ खर्च कमी करावा समारंभ कसा घ्यायचा याचे नियोजन हवे. क्रिडा विभागासाठी केलेली तरतूद मानसिक समाधानासाठी आहे. उत्कर्ष काही दिसत नाही. मनपाच्या शाळा, साफसफाईचे काम आपण खाजगी ठेकेदाराला देतो. त्यांचे उत्पन्न किती, आपले नियोजन किती. आपली एवढी परिस्थिती तरी आहे का. सर्व विभागांचे संगणकीकरण - यावर संशोधन केलेतर आजपर्यंत बराच खर्च केल्याचे स्पष्ट उघड होईल. खाजगी ठेकेदारांकडून सुरक्षारक्षक घेतो. ते एका झापडीचे असतात. याबाबतीत लक्ष देऊन खर्च करणे आवश्यक आहे. मनपाची वाहने असताना खाजगी वाहने अनेक ठिकाणी घेतलेली आहेत. त्याची गरज आहे का? पाणी पुरवठ्यातही खाजगी टँकरवर खर्च केला जातो. ज्या ठिकाणी पाणीपुरवठा सक्षम नाही तेथे टँकरने पुरवठा केला जातो. त्यापेक्षा यंत्रणा व्यवस्थित करा. वैद्यकीय विभाग - वाय.सी.एम. रुग्णालयात दरवर्षी प्रचंड प्रमाणात उपकरणे खरेदी केली जातात. आवश्यकता नसताना काही उपकरणे खरेदी केलेली आहेत. ती धूळखात पडलेली आहेत. यात लाखो-करोडो रुपये गेलेले आहेत. छोट्या छोट्या गोष्टी असतात, त्याकडे दुर्लक्ष करतो. हजारो रुपये खर्च करणारा मनुष्य ५/१० रुपयांचा विचार करत नाही. तशी आपली अवस्था झालेली आहे. बजेटवर बोलत असताना उपाययोजनेबद्दल बोललो. आपण संपूर्ण जबाबदारी आपल्यावर घेतली आहे. कडक नियोजन करणे गरजेचे आहे. तुम्ही चोऱ्या बंद केल्यातर खर्चावर नियंत्रण आणता येईल. बजेटमध्ये उपसूचना द्यायच्या नाहीत ही पद्धत पुढील वर्षी चालणार नाही. माझा राहिलेला वेळ माझे मित्र मा.मारुती भापकर यांना द्यावा.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, अर्थसंकल्पावर बोलताना पहिल्यांदा मला एका गोष्टीची आठवण येते. माणसाचे हात पाय बांधायचे आणि पाण्यामध्ये सोडायचे असा प्रकार येथे चाललेला आहे. कुठल्याही प्रकारच्या उपसूचना द्यायच्या नाहीत फक्त चर्चा करायची आणि बाहेर निघुन जायचे असे आहे. मोठे काम करताना छोटया कामाकडे दुर्लक्ष केले जाते असे आर.एस.कुमार यांनी सांगीतले आहे. एका राज्यातील राजाने एक फरमान काढले की राजवाडया समोर ठेवलेला रांजण दुधाने भरुन काढायचा. घरामध्ये थेंबभर जरी दुध ठेवले तरी पोरांच्या तोंडचे दुध काढून घेतले जाईल, त्यावेळेस एका म्हातारीने आपल्या घरातील सर्वांना अगोदर दुध देवून उरलेले दुध रांजणासाठी दिले त्यात तो रांजण भरला. केंद्रशासनाचा, राज्यशासनाचा निधी

येईल या आशेवर योजना आपण राबवितो व त्यामुळे वॉर्डातील कामाकडे दुर्लक्ष होते. शहरात मोठमोठे रस्ते होतील, चांगले पुल होतील परंतु वॉर्डामधील छोटया खड्डयांची दुरुस्ती होणार नाही अशी वेळ येणार आहे. आपण उत्पन्नाचे स्त्रोत बघत नाहीत, व्याजाच्या कर्जावर अवलंबून राहून वर्षाचे बजेट सादर करावे लागणार आहे त्यामुळे हा खेळ कोलमडल्याशिवाय राहणार नाही. लक्ष्मी,प्रसिध्दी आणि अब्रू या तीघीजणी असतात, लक्ष्मी म्हणते मी मोठमोठया श्रीमंताच्या घरी गेल्याशिवाय राहणार नाही, प्रसिध्दी म्हणते मी मोठमोठया राजकारण्यांच्या घरी गेल्याशिवाय राहणार नाही आणि अब्रू म्हणते मी एकदा गेलीतर पुन्हा येणार नाही. तसे या महापालिकेच्या आर्थिक बाबतीत एकदा बेअब्रू झालीतर ती पुन्हा येणार नाही. जकातीच्या उत्पन्नामध्ये घट होत आहे हि बाब कबूल केलेली आहे. करवाढीचा प्रस्ताव आपण कशासाठी करता. २१ टक्के करवाढ केलेली होती ती अमान्य करत ८ टक्क्यावर आणण्यास लावलेली आहे. त्यावेळेला मिडिया कुठे होती, पाण्याच्या तक्रारी आल्या की याला सत्तारुढ पक्ष जबाबदार आहे असे चित्र सर्वसामान्य नागरीकांपुढे जाते. मागच्या बजेटला मी सांगीतले आहे पाणीपट्टीचे बील घरपट्टीला जोडून द्यावे जेणेकरुन त्याची वसुली होईल. परंतु “ नळी फुंकीली सोनारे,ईकडून तीकडे जाई वारे ” पाणीपट्टीच्या बीलाची कधीही दखल घेतली जात नाही. आमच्या ग्रामीण भागातील पाणीपट्टीची बीले वाटली गेलेली नाहीत आणि कनेक्शन तोडणार असे सांगीतले जाते. आऊट कम बजेट सादर केलेले असेलतर गावठाणातील गटर या हेडखाली तरतूद केली होती त्यापैकी ७० ते ७५ टक्के केलेले नाही. यातून तुम्ही लॉकींग बजेट दिलेले आहे. तुम्ही सांगीतले आहे २० ते २७ कि.मी. चे नाले आहेत असे अनेक आकडे यात आहेत. निष्काळजीपणे वावरणा-या अधिका-यांवर काय कार्यवाही होणार आहे. ४९ कलमान्वये आपण अधिका-यांना कर्तव्य व जबाबदा-या देत असालतर त्याची संपुर्ण कल्पना या सभागृहाला दिली पाहिजे असा बीपीएमसी ॲक्ट सांगतो. चुकिच्या व्यक्तिच्या हातात चुकिचा कारभार गेलातर त्याचा मनस्ताप होतो. मागासवर्गीय कल्याणकारी योजनेसाठी मी आणि झ ोपडपट्टी कमिटिमधील सर्व सदस्य यांनी महाराष्ट्र शासनाचा जी आर दाखविला आहे. मागासवर्गीय कल्याणकारी योजनेवर एकूण बजेटच्या ५ टक्के रक्कम खर्च केली पाहिजे. ते याठिकाणी झालेले नाही. चांगले वाचनालय व अभ्यासीका व्हायला पाहिजेत त्या आपण केलेल्या नाहीत. या शहरामध्ये ७८ झोपडपट्टया आहेत. माता बालसंगोपन यासाठी ५० लाखाची तरतुद पुरेशी नाही त्यासाठी २ कोटीची आवश्यकता आहे याचा विचार केला पाहिजे. या संपुर्ण शहराची लोकसंख्या १७ लाखाच्या पुढे गेलेली आहे. वायसीएम मध्ये १२ खाटाचे आयसीयू केलेले आहे ते पुरणार नाही. आयसीयूला पर्याय आयसीयू असू शकतो. स्टेप डाऊन आयसीयू पर्याय होत नाही. आपल्याकडे बर्न युनिट नाही, पेशंटला ससून रुग्णालयामध्ये जावे लागते. वायसीएम हॉस्पिटलमध्ये दोन मजले रिकामे आहेत त्याठिकाणी हे होवू शकते. कॅन्सर युनिट आपण चालू करणार असे सांगीतले होते याची कुठे तरतूद केलेली दिसत नाही. आर्थिक खात्याशी निगडीत असलेले प्रत्येक काम व्यवस्थीत केले पाहिजे. बीलो टेंडर असल्यामुळे जेथे १५ लाखात

काम होणार आहे ते १० लाखात करणार असतीलतर साफसफाईचे काम कसे काय व्यवस्थीत होईल. त्यातील काही लोक गैर हजर असतीलतर उर्वरीत लोक कसे काय काम करु शकणार आहेत. एकत्रित मानधनावर असलेल्या लोकांना परमनन्ट करायचे असेलतर नवीन पदे निर्माण करुन त्यांना रोजगार दिलातर आपला खर्च वाया जाणार नाही. कायदासल्लागारांचे आवूटपुट काय याचे उत्तर मिळत नाही. त्यांनी किती केसेस लढल्या, किती जिंकल्या, महापालिकेचा किती फायदा झाला, किती तोटा झाला, याची आकडेवारी काढलीतर अर्थसंकल्पामध्ये उठून दिसणारी आकडेवारी दिसेल. एखादा प्रोजेक्ट हातामध्ये घेतलातर तो पुर्णत्वास गेला पाहिजे. केबलधारकांनी अनाधिकृतपणे केबल अंडरग्राऊंडमधुन टाकलेल्या आहेत त्यापासून सुध्दा उत्पन्न मिळेल. मध्यंतरी आपण बिल्डींगवरील टॉवरचा प्रश्न उपस्थित केला होता त्यामुळे ५ कोटी उत्पन्नामध्ये भर पडलेली आहे. तसे अजून केलेतर उत्पन्न वाढेल. एमएसईबी कडून येणारी रक्कम किती आहे ती कशी वसुल करु शकणार हे पाहिले पाहिजे. सर्वसामान्य नागरीकांना वेळेत व पुरेसे पाणी मिळाले पाहिजे. आपण उपकर लागू करणार यातूनच ८ टक्के वाढविले व पुढच्या वेळेस ८ टक्के वाढविलेतर सदस्यांना जनता रस्त्यावर फिरु देणार नाही. डीपी प्लॅनमधील रस्त्याच्या जागा सर्वसामान्य नागरीकांना विकल्या जातात त्यानंतर त्यांना समजते की या जागेवर महापालिकेचे आरक्षण आहे त्यामुळे त्यांचे नुकसान होते. तरी अशा जागांवर लवकरात लवकर डिमार्केशनची कार्यवाही व्हायला पाहिजे ते झालेले नाही. आरोग्याचा प्रश्न सर्वसामान्य जनतेशी निगडीत असतो अशा महत्वाच्या प्रश्ना विषयी महापालिकेनी हलगर्जीपणा केलातर ती महापालिका बरखास्त होऊ शकते. आपण मांडलेल्या बजेटचे स्वागत करतो आवुट कम बजेटची संकल्पना मांडली ती पुर्णत्वास जावी.

मा.सीमा सावळे :- मा.महापौर साहेब, आयुक्तांचे स्वागत केले पाहिजे कारण उपसूचना स्विकारणार नाहीत. आम्ही सूचना करुन अंमलबजावणी होणार नसेलतर आम्ही कशाला सूचना करायच्या. जेंडर बजेटचा विषय आलेला असताना दोन वर्षापुर्वी शिवसेनेच्या नेत्या निलम गो-हे यांनी जेंडर बजेटमध्ये कुठला कुठला समावेश करावा हे सांगीतले आहे. महिला भगिनीसाठी टॉयलेट,बाथरुम असायला पाहिजे, बंड साहेबांनी आश्वासन दिलेले आहे की याचा समावेश करणार आहोत. महिला भगिनीना पुण्यामध्ये किंवा पिंपरी चिंचवड शहरामध्ये वेगवेगळया ठिकाणी कामाला जावे लागते, त्यासाठी महिला बसेस ठेवायला पाहिजेत. बसेस मधील दोन-चार सीट वगळता सर्व पुरुषांचे सीट असतात. तरी महिलांकरिता विद्यार्थीनींकरीता स्पेशल बसेस सोडण्याची तरतूद करण्यात यावी किंवा पीएमपीएमएलला तशी विनंती करावी. अशिक्षीत महिलांसाठी रात्रशाळा राबवायला पाहिजे. महिला आणि बालकल्याण कमिटिच्या वतीने तशी विनंती केलेली होती. परवा भागीरथी वाघमारे म्हणून महिला आयुक्तांना भेटण्यासाठी आलेल्या होत्या त्यांना भेटू दिले नाही. तीन महिने झाले त्या थेरगाव कार्यालयामध्ये गेल्यानंतर

आपले कर्मचा-यांनी त्यांना उध्दट वागणूक दिलेली आहे. अशी नागरीकांना उध्दटपणे वागणूक मिळालीतर आपले उत्पन्न वाढणार नाही.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, अंदाजपत्रकावर चर्चा झालेली आहे चर्चेमधुन अंदाजपत्रकावर केलेली टिका म्हणजे गेल्या तीन-चार वर्षामध्ये सत्तारुढ पक्ष म्हणून केलेले पाप याचा पंचनामा झालेला आहे. आपण खाली असतातर आपणही बोलला असतात. अंदाजपत्रकावर आपण सुध्दा टिका केलेली आहे हे मी पाहिलेले आहे. बजेट करताना कोणत्याही प्रकारच्या उपसूचना घ्यायच्या नाहीत असे सांगीतले आहे. आपण सुध्दा माना डोलवल्या आहेत प्रशासन ज्या पध्दतीने कारभार करते त्याला मुकसंमती आपली आहे असे वाटते. महापौर साहेब, या शहरातील जनतेला आपल्या सत्तेमध्ये असलेल्या पक्षानी काय दिले. यामध्ये १०० कोटीचे कर्ज दाखविलेले असलेतरी २१२ कोटी बँकेकडून घेणार आहोत. पुढच्या आर्थिक वर्षात ४१२ कोटीचे कर्ज घ्यावे लागेल. मनपाची आर्थिक स्थिती पाहिलीतर अतीशय खराब आहे. मोठया ठेकेदारानां काम दिलेले आहे त्यांना बील सुध्दा मिळत नाही. ज्यांनी चुक केली त्याचे खापर या शहरातील जनता भोगते आहे. तत्कालीन आयुक्त बंड साहेब करामध्ये वाढ करुन गेले. त्यांनी दुपट्टीने वाढ केली आता आपण ८ टक्के वाढ केली. या शहरात राहणा-या सर्वसामान्य जनतेला आपण जगू देता का नाही असा प्रश्न आहे. ६० टक्के कामगार वर्ग नौकरी करतो आपण जी टॅक्स मध्ये वाढ केलेली आहे ती परवडण्यासारखी नाही. प्रामुख्याने करसंकलनमध्ये गेल्या दोन-तीन वर्षाचा इतिहास पाहिलातर करांचे ३० ते ३५ कोटीचे उत्पन्न जमा होते ते आज ८९ कोटी मिळेल असे अपेक्षीत धरलेले आहे. परंतु जे थकीत आहे ते सुध्दा वसुल करण्याचे काम आपण केले पाहिजे. गेल्या दोन-तीन वर्षाचा इतिहास पाहिलातर या शहराची झपाटयाने वाढ होत आहे. या शहरात राहण्यासाठी नागरीक मोठयाप्रमाणात येतात. जे नागरीक या शहरात राहण्यासाठी येतात त्यांचा कर वाढवून खीसा कापण्याचे काम आपण करतो. शहर वाढत असताना,मुलभूत सुविधा देत असताना करामध्ये नागरीकांची लुट होत आहे ती थांबली पाहिजे. बांधकाम परवानगीची आकडेवारी पाहिलीतर सन २००६-०७ ला ५७ कोटी ७४ लाख जमा झाले होते, सन २००७-०८ ला ५६ कोटी जमा झाले होते, सन २००८-०९ ला ८० कोटी जमा झाले होते व सन २००९-२०१० ला ८८ कोटी जमा झालेले आहेत. मार्च एण्डपर्यंत ९० कोटी जमा होतील. बांधकाम व्यावसायीकाचे मोठया प्रमाणात उत्पन्न या महापालिकेला मिळते. हे करत असताना सामान्य मानसाच्या करामध्ये भरमसाठ वाढ केलेली आहे, जकातीचा सोर्स मोठया प्रमाणात आहे कंपन्यामध्ये घट झालेली आहे व नाक्यावरील उत्पन्न वाढलेले आहे. नाक्यापासून चालू आर्थिक वर्षामध्ये ३८० कोटीचे उत्पन्न मिळालेले आहे आणि कंपनी पासून २९७ कोटीचे उत्पन्न मिळाले आहे. ही आकडेवारी पाहिलीतर नाक्यातून मिळणारे उत्पन्न जास्त प्रमाणात येते याचाच अर्थ असा होतो की या शहरात मॉल असतील, दुकान असतील यांची संख्या वाढलेली आहे. शहरात लोक येतात म्हणून त्यांच्या पैशाची लुट करायची का, हे थांबविले गेले पाहिजे.

गेल्या तीन वर्षाचा इतिहास पाहिलातर या महापालिकेमध्ये वाढीव निवीदा मंजूर करण्याच्या नावाखाली ४५० कोटीची लूट केलेली आहे. आपल्या कारकिर्दीमध्ये वाढीव निवीदा मंजूर झालेल्या नाहीत. मागचा इतिहास पाहिलातर माझ्याकडे माहिती आहे. त्यावेळी ३८७ कोटी जादा मोजलेले आहेत आपण कर्ज घेणार आहोत, बीओटी प्रकल्प राबवितो आहोत. आकाश चिन्ह व परवाना विभागाकडून उत्पन्न ३ कोटी मिळते आहे,करसंकलन विभागाकडून उत्पन्न मिळते आहे परंतू त्याठिकाणी सिंगापूरला नेणार म्हणून अनेक लोकांनी टॅक्स भरलेला आहे. आज याठिकाणी सल्लागारांचे जाळे पसरलेले आहे. या सल्लागारावर कोटयावधी रुपये जातात. आज महापालिकेचे अधिकारी बील बनवत नाहीत,महापालिकेचे अधिकारी फक्त सहया करतात त्यासाठी टक्केवारी दिली जाते. सल्लागार आणि ठेकेदार हे दोघे मिळून महापालिकेची लूट करतात. या अगोदरच्या कारकिर्दीमध्ये ठेकेदाराला पोषक अशा टर्म आणि कंडीशन्स टाकल्या गेलेल्या आहेत त्यामुळे कोटयावधी रुपयाची लूट झालेली आहे. ग्रामीण भागामध्ये २८ कोटी ७४ लाखाची थकीत बाकी आहे त्या लोकांना न्याय द्यावा अन्यथा वसूली करावी त्यांना तूम्ही आश्वासन दिलेले आहे आपण पुढाकार घ्यावा. या महापालिकेचा कारभार करत असताना सक्षम महापौर या महापालिकेला मिळालेले आहेत. आपण काम करणारे महापौर म्हणून या शहराला माहित आहे, आपल्या कारकिर्दीमध्ये अशा त्रुटि राहू नयेत. आरोग्य विभागावर किती खर्च करतो. आरोग्य वैद्यकीय विभागात या बजेटच्या अनुषंगाने १६५ कोटी खर्च करतो आहोत. एवढया मोठया प्रमाणावर खर्च करत असताना या शहराची परिस्थिती काय आहे. आरोग्याची समस्या गंभीर आहे. ६०-७० गाडया कचरा उचलण्यासाठी घेतलेल्या होत्या त्या चालू आहेत का हे पाहिले पाहिजे. आपल्या शहरामध्ये ६७९ रुग्ण डेंग्यूचे आढळून आलेले आहेत,तसेच मलेरिया व स्वाईन फ्ल्यूचे रुग्ण आहेत. हे रुग्णांचे शहर झालेले आहे. वैद्यकीय आणि आरोग्य या दोन सेवा म्हणजे या शहरातील जनतेचे आरोग्य व्यवस्थित ठेवणा-या सेवा आहेत. आपण केवळ ठेकेदार पोसण्यासाठी खर्च करतो का याचाही विचार केला पाहिजे. या शहरातील सर्वसामान्य नागरीक प्रामुख्याने जो करदाता आहे त्याला मुलभूत सुविधा मिळाल्या पाहिजेत वायसीएम वर खर्च करत असताना वैद्यकीय बीलापोटी ५ कोटी ५० लाखाची तरतूद वाचलेली आहे. एवढया मोठयाप्रमाणावर खर्च करत असालतर वैद्यकीय प्रतिपुर्तीचे बीलाचा खर्च कमी झाला पाहिजे. रुग्णालयावर व वायसीएम हॉस्पिटलवर मोठयाप्रमाणावर खर्च आहे. वैद्यकीय बिलांच्या प्रतिपुर्ती संदर्भात निर्णय घेतला पाहिजे. भविष्यामध्ये अशी चुक होवू नये की ज्यामुळे आपण आर्थिक संकटामध्ये सापडू. वायसीएम मध्ये साफसफाईला २ कोटी ५० लाखाची तरतूद केलेली आहे. पीपीपी वर बर्न युनिट आणि कॅन्सर युनिट देणार आहेत. गेले तीन वर्ष मी या गोष्टी पाहतो. या बाबतीत कोणत्याही प्रकारचा निर्णय घेत नाहीत. निर्णय घेणार नसालतर अशा गोष्टीचा उल्लेख अंदाजपत्रकामध्ये करु नये. बजेटमध्ये गुंठेवारीचे उत्पन्न दाखविलेले आहे परंतु जून्या फाईली पेन्डींग आहेत. ज्यांनी फाईली दाखल

केल्या त्या नागरीकांची ससेहोलपट होते, काहीतरी दिल्याशिवाय फाईल वर जात नाही. जेवढे गुंठेवारीचे प्रकल्प क,ड प्रभागामध्ये पेन्डींग आहेत तेवढे मार्गी लावावेत नागरीक आपल्याकडे पैसे भरु इच्छितात. उत्पन्न मिळण्याच्या संदर्भात आपण सुध्दा पाठपुरावा केला पाहिजे. हे शहर टँकरमुक्त करण्याच्या दृष्टिने मिटर पध्दत लागू केली. तत्कालीन आयुक्त दिलीप बंड यांनी खुलासा केला होता मीटर पध्दत लागू केल्यानंतर २४ तास पाणी नागरीकांना मिळेल, संपुर्ण शहरात समान पाणी वाटप होईल. गेल्या वर्षी टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी ५० लाखाचे बील दिलेले आहे, हे शहर टँकरमुक्त झालेले नाही. गेल्या तीन दिवसापासून शहरात पाण्याची परिस्थिती गंभीर आहे. जवळपास २२ कोटी पाणी उचलण्यासाठी रेव्हेन्यू विभागाला देतो. २७ कोटीचे बील आदा करतो. एवढया मोठया प्रमाणात खर्च करत असताना scada सिस्टीमचा वापर करण्यासाठी पाऊले उचलली पाहिजेत. बंद पाईपलाईनसाठी तरतूद केलेली आहे. बील संबंधीत ठेकेदाराला दिलेले आहे परंतु बंद पाईपलाईन योजना झालेली नाही. अंदाजपत्रकामध्ये गहुंजे येथे बंधारा बांधण्यासाठी ३ कोटीची तरतूद केलेली आहे. पहिल्या निवीदा काढतो आणि नंतर त्या निस्तारायला लावतो. पहिली लॅण्ड ॲक्वीझेशन प्रक्रिया पुर्ण केली असतीतर पुढील प्रश्न उद्‌भवणार नाहीत. मीटर पध्दतीने पाणी वाटप- मीटर दुरुस्तीसाठी या अंदाजपत्रकामध्ये ७६ लाख खर्च अपेक्षीत धरलेला आहे पुढच्यावेळेस १ कोटी जाईल, जसे वय वाढेल तसे मीटर नादुरुस्त सुध्दा होतील. भविष्यामध्ये आपण करत असलेल्या कामाची महापालिकेला आर्थिक झळ सोसावी लागणार आहे का याचा सुध्दा विचार करावा लागेल कारण महापालिकेसमोरील ग्रेड सेपरेटर करत असताना मी सांगीतले होते आज सुध्दा त्यास ६० ते ६५ लाख वर्षाला खर्च करावा लागतो. त्याठिकाणी ब्लॉक बसविले आहेत. रस्त्यावर ब्लॉक बसवितो त्याचे आयुष्यमान दोन ते आडीच वर्षाचे असते त्यामुळे पुढची परिस्थिती गंभीर होते. भविष्यामध्ये याकडे लक्ष दिले पाहिजे. ३ कोटीचे बील बीव्हीजीला देतो त्यात दिड कोटी शाळा साफसफाईसाठी देतो. त्याठिकाणी आपण व्हिजीट द्यावी, शाळेमधील साफसफाई व्यवस्थीत होत नाही. त्याठिकाणी चुकिच्या पध्दतीने कर्मचारी वर्ग नेमलेला आहे. प्रत्येक शाळेमध्ये मुलांच्या तक्रारी येतात. बजेटमध्ये स्थापत्य विभागाच्या कामाला मोठया प्रमाणात तरतूद ठेवलेली आहे. प्रभाग कार्यालयावर १६० कोटी तरतूद आहे, डांबरीकरण १४५ कोटी. तरतूद आहे. JNNURM अंतर्गत पाईपलाईन टाकण्याचे काम काही भागामध्ये झालेले आहे. रस्ता खोदण्याचे काम चालू आहे. आजची परिस्थिती अशी आहे की तेथे डांबरीकरण करणे आवश्यक आहे व ते डांबरीकरण १० लाखात होणार नाही म्हणून भविष्यामध्ये ठोस निर्णय घ्यावे लागतील. नागरीकाच्या मुलभूत स्वरुपांच्या गरजा आहेत त्या तशाच राहतात. क्रिडा विभाग, वाचनालयावर प्रामुख्याने खर्च केलेला आहे. वाचनालयाची परिस्थिती भयानक आहे. वाचनालयाच्या कर्मचा-यांवर दिड कोटी खर्च करतो. एकतर वाचनालय बंद करुन टाका किंवा चालवायास दया. वाचनालयामध्ये नवीन पुस्तके

नाहीत, यावर्षी १० लाखाची तरतूद ठेवलेली आहे. मागच्या वर्षी १० लाख ठेवलेली होती परंतु पुस्तके खरेदी झाली नाही. अधिका-यांना मोठया कामामध्ये रस आहे लहान कामामध्ये रस नाही. मोठे काम कसे मिळतील याकडे लक्ष आहे. व्यायामशाळेची परिस्थिती भयानक आहे तेथील साहित्य चोरीला जाते. या शहरामध्ये विवीध स्पर्धा घेतल्या जातात त्याच्या नावाने सुध्दा महापालिकेची लूट होते. मोठमोठे मंडप टाकले जातात व पैसे दिले जातात. एखादया संस्थेच्या माध्यमातून स्पर्धा होत असतीलतर त्यांना सुध्दा निम्मा खर्च करायला सांगावे. मोठया प्रमाणात क्रिडा स्पर्धा घेवून त्यात खर्च केला जातो तो टाळला पाहिजे. ड्रेनेजच्या बाबतीत सांगायचे झालेतर च-होलीला १२ कोटीची एसटीपी साठी तरतूद ठेवलेली आहे. परंतू आपण हे करण्या अगोदर लॅण्ड ॲक्वीझेशन केले असतेतर पुढचे प्रकार झाले नसते आपण टेंडर काढण्याची घाई करतो. सिस्टमॅटिक काम केलेतर चुका होणार नाहीत. आपण घरकुल योजना राबवित आहोत त्यासाठी तरतूद केलेली आहे. मिलिंदनगर, विठ्ठलनगर, से-२२ मध्ये योजना राबवितो. काम करत असताना या महापालिकेमध्ये यावर्षीचे आणि पुढच्या वर्षीचे ठेकेदाराचे बील देण्यासाठीच बजेट केलेले आहे असे वाटते. मोठे प्रकल्प होणार नाहीत. या शहरातील करदाता नागरीक आहे त्याला मुलभूत सुविधा मिळाल्या पाहिजेत. गेल्या आर्थिक वर्षात सुशोभिकरणावर ५ कोटी ८९ लाख खर्च झालेला आहे. राज्यशासनाने मंत्रालय सुशोभिकरण करण्यासाठी ५ कोटी खर्च केलेला आहे आणि आपण आतापर्यंत ७ कोटी ५० लाख खर्च केला आहे. स्थापत्य विभागासाठी १ कोटी ६१ लाख, ड-प्रभाग कार्यालयासाठी ४७ लाख, मुख्य इमारतीमध्ये ३ कोटी ८० लाख असा खर्च झालेला आहे हे कुठेतरी थांबले पाहिजे. या बजेटमध्ये टेलिफोन बिलासाठी ५० लाखाची तरतूद केलेली आहे यामध्ये कपात केली पाहिजे. कोटयावधीचे कार्यालय बनवितो मग तेथील कारभार सुधारतो का. हे थांबविले पाहिजे. विद्यार्थी गुणवत्ता वाढ विकास प्रकल्पाच्या नावाखाली तत्कालीन आयुक्त दिलीप बंड यांनी ४२ कोटीचा प्रकल्प आमच्या माथी मारला होता त्यास आम्ही विरोध केला होता. त्यावर आतापर्यंत ८ कोटी खर्च झालेला आहे. त्या संस्थेने ६ कोटीचे बील सादर केलेले आहे ते थांबविलेले आहे परंतु खालचे अधिकारी ते बील देण्यामध्ये घाई करतात. ४० वर्षाच्या शिक्षकाला २० ते २२ वर्षाचा मुलगा तेथे शिकवितो, कसली ही गुणवत्ता हा प्रकल्प बंद करुन टाकावा. त्या प्रकल्पाअंतर्गत जे सॉफ्टवेअर दिलेले आहे ते वापरात आहे का हे बघावे ते धुळखात पडले आहे. आपण करामध्ये सक्ती करतो,पाण्याचे नळ कनेक्शन तोडतो आणि याठिकाणी अशी लुट चाललेली आहे ती थांबवावी. लाईट बीलापोटी आपण कोटयावधीचे बील भरतो, प्रशासकीय इमारतीचे १ कोटीचे बील भरतो. भविष्यामध्ये महापालिकेची असे बील भरण्याची परिस्थिती राहणार नाही म्हणून यामध्ये काटकसर केलीतर आपले पैसे वाचतील. भविष्यामध्ये आपण काही गोष्टीला लगाम घातला पाहिजे. आयुक्त साहेब आपण स्वत:हून बदली मागता असे वाटते. आपण महापालिकेच्या कारभारावर नियंत्रण आणलेले आहे त्याबद्दल धन्यवाद देतो. वाचनालयावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. मनपाच्या इमारती बीओटी बेसीसवर

जातात का, भाडयाने जातात का हे बघा व त्यातून उत्पन्न मिळवा. स्मशानभूमीची परिस्थिती दयनीय आहे. स्मशानभूमीवर १ कोटी २० लाख खर्च करतो परंतु त्याठिकाणी तशाप्रकारची स्वच्छता होते का नाही हे सुध्दा पाहिले पाहिजे. आपण जे पैसे खर्च करतो त्याचा मोबदला महापालिकेला मिळतो का नाही हे पाहिले पाहिजे. हॉकर्स झोनचे महापालिकेला उत्पन्न मिळेल परंतू त्या बाबतीत निर्णय घेतला जात नाही. तो निर्णय घेतला असतातर त्यांना हक्काचा व्यवसाय मिळाला असता आणि महापालिकेलाही उत्पन्न मिळाले असते याकडेही लक्ष घालावे. महिलांसाठी स्वच्छतागृह झाले पाहिजे व पुरुषांसाठीही स्वच्छतागृह झाले पाहिजे. हे विभागवार किंवा चौकाचौकामध्ये व्हायला पाहिजे. काही स्वच्छतागृह पाडले आहेत, स्वार्थापोटी पाडले का गरजेसाठी पाडले याकडेही लक्ष दिले पाहिजे. पवना सुधार योजने बाबत सांगायचे झालेतर पवना नदीला ड्रेनेजचे पाणी जाते ते थांबले पाहिजे. पवना नदी दुषित करण्यास आपण सुध्दा जबाबदार आहोत. ब-याचशा प्रमाणात पवनानदीमध्ये उघडया गटाराचे पाणी मिळते, तसेच इंद्रायणीनदीचे सुध्दा आहे हे थांबले पाहिजे. या शहरावर कोटयावधी रुपयाचा खर्च केला जातो आपले जे प्रकल्प आहेत ते या शहरातील नागरीकांना समजावेत पिंपरी चिंचवड दर्शन बस चालू करावी म्हणजे नागरीकांना या शहरातील पाहण्यासारखी स्थळे पाहता येतील. महापालिकेमध्ये ताथवडेगाव समाविष्ट केलेले आहे परंतु तेथील विकासासंदर्भात तरतूद यामध्ये नाही. जसे नवीन गाव निवडणूकीपुरते घेतले तशी भावना ताथवडेच्या बाबतीत होवू नये. अंदाजपत्रक म्हणजे प्रशासनाने केलेला ताळमेळ आहे.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सन २०१०-२०११ यावर्षाचे बजेट याठिकाणी मांडलेले आहे. मनपाचे मुळ बजेट ११८४ कोटी ७६ लाख २७ हजार ३७५ रुपयाचे आहे. JNNURM अंतर्गत जो खर्च करणार आहोत तो ११९२ कोटी ८९ लाख ४ हजार आहे हे दोन्ही मिळून २३७७ कोटी ६५ लाख ३१ हजार ३७५ चे प्रकल्प आपल्या शहरामध्ये राबविले जाणार आहेत. मागचे बजेट सुध्दा असेच २ हजार कोटीचे होते. याबाबतीत काय फलनिष्पत्ती आहे हे वाचून दाखविलेले आहे. ५० ते ५५ टक्के पेक्षा अधिक फलनिष्पत्ती दिसत नाही. अंदाजपत्रक करत असताना उपसूचनाचा समावेश करणार नाहीत अशाप्रकारच्या भावना स्थायी समिती अध्यक्ष शितोळे यांनी व्यक्त केल्या. आयुक्त साहेब स्थायी समितीला बजेट सादर करतात. मी मागच्या तीन वर्षापासून अनुभवतो अंदाजपत्रकावर मा.आयुक्तांच्या सूचनाचे मोठयाप्रमाणावर पालन केले जाते बजेटच्या संदर्भात बोलत असताना महापालिकेच्या तिजोरीमध्ये येणारा एक रुपया कसा खर्च होतो या संदर्भात मोठया प्रमाणात चर्चा झालेली आहे. आपण जमेची बाजू पाहिलीतर जकात हे सगळयात महत्वाचे उत्पन्नाचे स्त्रोत्र आहे. यावर्षी जकात या बजेटमध्ये ६४.२३ % दाखविणेत आलेली आहे. ७६० कोटी ९४ लाख जकातीच्या माध्यमातून मिळणार आहेत मी सर्वात

प्रथम जकात विभागाचे प्रमुख मुंढे साहेब यांचे मनापासून अभिनंदन करेल, कौतूक करेल. मी दोन-चार दिवसापुर्वी त्यांच्याकडे गेलो होतो, जकातीच्या उत्पन्नाची काय स्थिती आहे याची विचारणा केली होती त्याची त्यांनी माहिती दिली. नाक्यावरील उत्पन्न ३० ते ३२ कोटी मिळाले आहे. यापुर्वी जकानाक्यापासून उत्पन्न २२ कोटी मिळत होते.ते महिन्याला १० कोटी वाढत असेलतर आतापर्यंतची जकातीची गळती किती आहे याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. जकातचोरावर मोठया प्रमाणात पायबंद केला आहे. जकातनिरीक्षक, भरारी पथक असेल त्यांना जकातीच्या अधिका-यांनी पाठबळ देण्याचे काम केलेतर जकातीचे उत्पन्न वाढू शकते. परंतू जकातनिरीक्षकाला महापालिकेच्या दालनामध्ये कोंडून काही लोक मारतात त्यासंदर्भात पोलीस कम्प्लेन्ट पण होत नाही. ज्यांना मारहाण झाली त्या कर्मचा-यांना संरक्षण दिले जात नाही आणि पोलीस केसही न होता ते प्रकरण संगनमताने दडपले जाते. नाक्यावरील उत्पन्न आणि कंपनीचे उत्पन्न बघितलेतर सन २००७-०८ साली नाक्याचे वार्षिक उत्पन्न २७४ कोटी, २००८-०९ साली ३६० कोटी व २००९-१० या आर्थिक वर्षामध्ये ३५१ कोटी आहे म्हणजे नाक्यावरील उत्पन्न वाढविण्याचे काम जकात अधिक्षकांनी,जकात प्रमुखानी व त्यांच्या टिमने केलेले आहे. त्याचप्रमाणे कंपनीचे उत्पन्न ५०१ कोटी नंतरच्या वर्षी ४०७ कोटी व आता २००९-१० चे २९७ कोटी आहे. एकिकडे नाक्याचे उत्पन्न वाढते आहे आणि दुसरीकडे कंपन्यांकडून येणारी जकात ही कमी होत आहे. आपल्या भागामध्ये मोठमोठया कंपन्या आहेत त्याठिकाणी मोठयाप्रमाणात साखळी आहे. काही लोक त्याठिकाणी संगनमत करतात व जकातीच्या गाडया त्या कारखान्यापर्यंत पोहचविण्याचे काम करतात. महापालिकेची जकात हे आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत्र आहे,महापालिकेचा कणा आहे त्यात कठोर भूमिका घेतली पाहिजे त्यात जे कर्मचारी अधिकारी यांचा सहभाग असेल त्यांच्यावर कठोर कार्यवाही केली पाहिजे. जे जकात चोर राजकीय पक्षाशी संबंधीत असतील,मोठमोठे व्यापारी असतील हे दहशत करतात कर्मचा-यांच्या अंगावर गाडी घालून मारुन टाकु असे म्हणतात, या कर्मचा-यांना संरक्षण देणे महापालिकेचे काम आहे. जकातीच्या संदर्भात आपल्या सर्व कर्मचा-यांना व अधिका-यांना संरक्षण देणे महापालिकेचे काम आहे. महापालिकेचे दुसरे उत्पन्नाचे स्त्रोत्र करसंकलनाचे आहे. करसंकलनाच्या संदर्भात बोलत असताना सन २००७-०८ चे उत्पन्न ५२ कोटी ९३ लाख ८ हजार आहे, सन २००८-०९ चे उत्पन्न ६३ कोटी ७२ लाख ८५ हजार २६३ आहे , सन २००९-१० चे उत्पन्न ८४ कोटी ५३ लाख ७३ हजार आहे व यावर्षीचा अंदाज ९९ कोटी ७८ लाख आहे. सन २००७-०८ चे करसंकलनचे उत्पन्न ५२ कोटी ९३ लाख ८ हजार व आज आपला अंदाज ९९ कोटी ७८ लाख आहे. ४ टक्के मलनिस्सारण कर वाढविलेला होता ४ टक्के पाण्यावरचा लाभकर वाढविला आहे व पुन्हा ८ टक्के कर वाढविलेला आहे एकूण करमुल्यावरती वाढविलेला कर आहे तो ५० ते ६० टक्के आहे. आमचा करवाढीला विरोध होता व आजही आहे आणि अजून सुध्दा त्याच्यावर आपण विचार करावा व या शहरामध्ये सामान्य नागरीक राहू द्यावा. आपण

करवाढ केलेली आहे. पाण्याच्या संदर्भात बोलतो, मीटर पध्दतीवर बोलत असताना दिलीप बंड आयुक्त होते त्यावेळेला हा विषय आला. मीटर पध्दत सामान्य नागरीकांना परवडणारी नाही , ही किचकट पध्दत आहे, मिटर चोरीला पर्याय नाही, मिटर नादुरुस्त होऊ शकते. सोसायटया आणि अपार्टमेंट मध्ये पाणी बीलाचे डिव्हायडेशन करता येणार नाही,चाळीचा प्रश्न आहे हे सर्व प्रश्न मांडले होते. याठिकाणी करवाढ किती ठेवायची किती नाही हा संपुर्ण सभागृहाचा अधिकार आहे. तुपे साहेबांचे मला पाणीपुरवठयाच्या वतीने पत्र आलेले आहे, त्यामध्ये असे आहे की मनपाच्या सभासदांच्या निर्णयाची अंमलबजावणी प्रशासन करते, याचाच अर्थ हे सर्व सभागृहाने लादलेले आहे. हे सर्व आपणच केलेले आहे. बजेटवर महापालिकेच्या प्रशासनाचे राज्य चालले आहे. तुमच्याशी आयुक्त कानामध्ये बोलतात परंतु आम्हांला तशाप्रकारचा रिस्पेक्ट मिळत नाही, आमचा फोन घेतला जात नाही. आरोग्य अधिकारी डॉ.नागकुमार असतील, डॉ,अय्यर असतील. परवा पत्रकार परिषद झाली तूपे यांनी सांगीतले आहे की मारुती भापकर मिटर पध्दतीचे समर्थन करतात अशाप्रकारचे चुकिचे वक्तव्य त्यांनी केलेले आहे. ब-प्रभागाच्या सदस्यांनी पाण्याच्या संदर्भात भूमिका मांडली आहे. वर्तमानपत्रामध्ये तशाप्रकारची बातमी आली आहे. जनमताचा आदर करुन तशा प्रकारचा सदस्यांनी बोलण्याचा प्रयत्न केलातर पत्रकारपरिषदेमध्ये नगरसेवकांना खोटारडे आहेत असे वक्तव्य प्रविण तूपे यांनी केलेले आहे. अशाप्रकारचे वक्तव्य अधिकारी करत असतीलतर सभागृहात जाहिर निषेध करतो. पिंपरी चिंचवड नाटयगृहामध्ये अशोक हांडे यांचा “ मराठी बाणा ” हा कार्यक्रम होता त्याठिकाणी काही लोक गेले, गोंधळ झाला, त्याठिकाणी बीना तिकिट जावून गोंधळ झाला, साहेबराव गायकवाड यांनी स्टेटमेंट दिले की नगरसेवकांच्या कार्यकर्त्यानी गोंधळ घातला आहे. फुकटे कार्यकर्ते आहेत असे त्यांनी सांगीतले. अशाप्रकारचे वक्तव्य नगरसेवकांच्या बाबतीत केले जाते. नगरसेवकांचे कार्यकर्ते फुकटे म्हणजे नगरसेवकांचा अपमान आहे म्हणून सांगतो या महापालिकेवर प्रशासनाचे राज्य आहे, या बजेटवर प्रशासनाची छाप आहे. वायसीएम हॉस्पिटलचे अनेक प्रश्न आहेत. वैद्यकिय अधिकारी असतील, आरोग्य अधिकारी असतील त्यांनी सन्मा.नगरसदस्यांचा आदर केला पाहिजे,त्यांच्या भावना राखल्या पाहिजेत अशाप्रकारची माझी भूमिका आहे. पाण्याच्या संदर्भात भरपुर चर्चा झालेली आहे, अनेक मुद्ये मांडलेले आहेत. महापालिकेच्या बजेटच्या संदर्भात बोलत असताना आमच्या उपसूचना घेणार नाहीत असे सांगीतले आहे विशिष्ठ लोकांच्या उपसूचना स्थायी समितीमध्ये घेतल्या आहेत. उपसूचना घ्यायच्यातर सगळयांच्याच घ्याव्यात नसेलतर कोणाची सुध्दा घेवू नका. १०५ वॉर्डासाठी तरतूद केलेली आहे. आयुक्तांनी सांगीतले एका वॉर्डासाठी वार्षिक दोन कोटी अशा प्रमाणात तरतूद देतो. १०५ वॉर्डामध्ये आतापर्यंत एकुण किती खर्च झालेला आहे. कुठल्या वॉर्डात अधिक रक्कम खर्च झाली, कुठल्या वॉर्डात कमी खर्च झाली. राज्याचा विचार केलातर विदर्भाला जसा कमी निधी असतो तसे दिलीप बंड साहेबांच्या

काळामध्ये ज्या वॉर्डाला कमी निधी मिळाला त्या वॉर्डाला अधिक निधी दिला पाहिजे. काही वॉर्डामध्ये १२० कोटी खर्च झालेला आहे तर काही वॉर्डात १४० कोटी,८० कोटी असा खर्च झालेला आहे. ग्रामीण भागातील वॉर्डामध्ये अधिक खर्च केला पाहिजे हे मान्य आहे. जून्या भागामध्ये कमी खर्च होणार परंतु काही ठिकाणी ५ कोटी तर काही ठिकाणी १२० कोटी एवढी विसंगती योग्य नाही. नवा राजा, नवे नियम असे व्हायला नाही पाहिजे. कुठलेही काम आणि धोरण ठरवत असताना मागे गेले पाहिजे आणि पुढच्या वर्षाचा विचार करुन धोरण आखले पाहिजे. आपण आला, आपले नियम वेगळे, बंड साहेबांचे नियम वेगळे त्यामध्ये आमच्या सारख्यांचा बळी जातो. आयुक्त साहेब आपण काही चांगले सुध्दा काम केलेले आहे. आपण वाढीव खर्चाला पायबंद केलेला आहे. आमचे काही काम थांबले, रखडले काही हरकत नाही परंतु वाढीव खर्चाला आळा घातला आहे. तूमच्या येण्याच्या अगोदर जी चुकिची कामे झालेले आहेत त्यावर कोण कार्यवाही करणार. आपण शहर अभियंता उगिले यांच्या कार्यकाळामध्ये वाढीव खर्चाचे कामे झाली त्याची चौकशी करतो म्हणाला होता त्याचे काय झाले. लेखापरिक्षण आक्षेपा मध्ये २५० कोटी आहेत,आम्ही पत्र देतो, वर्तमानपत्रावाले बातमी देवून थकले. दिड कोटी ऑडीटवर खर्च करतो त्याचा रिपोर्ट स्थायी समिती समोर ठेवला जातो, स्थायी समिती कार्यवाहीच्या संदर्भात अग्रह धरत नाही का, का कार्यवाही करत नाहीत. आपण नळ कनेक्शन तोडण्याची कार्यवाही तत्परतेने करतो. ५ लाखापेक्षा अधिक रक्कम असलेल्या मिळकतधारकांची एकूण रक्कम १०० कोटीची आहे, ती रक्कम वसूल का करत नाहीत.सोन्यावरच्या जकातीबाबत भाई सोनवणे बोलले. दारुवर,स्टिलवर जकाती संदर्भात कार्यवाही केलीतर कर्ज काढण्याची वेळ येणार नाही. वायसीएम संदर्भात बोलत असताना अधिक खर्चाच्या तपशीलात जाणार नाही. वायसीएम मध्ये बर्नयुनिट व्हायला पाहिजे असे सांगीतले होते, अत्यावश्यक सेवे संदर्भात गांभीर्याने विचार केला पाहिजे. बीव्हीजीला ज्यावेळेला महापालिकेच्या मुख्यालयाचा ठेका देण्यात आला, वायसीएमचा ठेका देण्यात आला त्यावेळेला वायसीएमचा ६० ते ७० लाख खर्च येत होता आता २ ते ३ कोटी खर्च येतो. बीव्हीजीला संरक्षण देण्याचे काम का करता. केएसबी चौक रस्ता, मोठे प्रोजेक्ट थांबवा असे सांगीतले आहे. वॉर्डामधील रस्ते झाले पाहिजेत. आमच्या रस्त्याच्या खर्चामध्ये कपात केली आम्ही काही बोललो नाहीत, तीन-तीन वर्षे आमचे प्रोजेक्ट थांबविले आम्ही काही बोललो नाहीत परंतू बीव्हीजीला आपण का बोलत नाहीत. JNNURM अंतर्गत प्रोजेक्ट आपण हाती घेतले आहेत JNNURM अंतर्गत आपण करारनामे केलेले आहेत. दि. ८.१२.२००६ रोजी करारनामा झाला आणि या करारनाम्यानुसार आम्ही सर्वसामान्य नागरीकांकडून युजर चार्जेस टप्याटप्याने वसुल करु अशाप्रकारचे पत्र केंद्रशासनाला,राज्यशासनाला दिलेले आहे याची अंमलबजावणी सुरु झाली आहे. केंद्रशासनाच्या,राज्यशासनाच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थेवर मोठया प्रमाणावर अतिक्रमण व्हायला लागले आहे. स्व.राजीव गांधीनी घटनेच्या ७३,७४ व्या कलमामध्ये बदल करुन स्थानिक स्वराज्य संस्थाना अधिकार

प्रदान करण्याचे काम केले. सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे म्हणून अशाप्रकारचा बदल त्यांनी केला. आज करारनाम्याचा परिणाम म्हणून पाण्याची मिटर पध्दत लादली गेली आहे, मिळकतकरामध्ये प्रचंड वाढ झालेली आहे, ती ६० ते ६५ टक्के झालेली आहे, ही या करारनाम्याची मेख आहे म्हणून या करारनाम्यावर पुर्नविचार करावा अशी मागणी अनेकवेळा केलेली आहे. पीएमपीएमएलच्या संदर्भात बोलतो या करारनाम्यामुळे त्यांनी दरवाढ केलेली आहे त्या दरवाढीचा विषय सभागृहामध्ये आला का? अधिकारात कपात होत चालली आहे. SPV कंपनी स्थापन झाली त्यावेळी मी सांगीतले या माध्यमातून हजारो कोटीचा खर्च होणार आहे, यापुढच्या काळात विधी समितीला, स्थायी समितीला हे होणार नाही, त्यांच्या अधिकारामध्ये कपात होणार आहे त्यावेळेस त्याचा विचार केला नाही JNNURM अंतर्गत जो करारनामा झालेला आहे त्याच्या माध्यमातून मोठयाप्रमाणात स्थानिक स्वराज्य संस्थेचे कंपनीकरण, मोठयाप्रमाणात खाजगीकरण या शहरातील करदात्या नागरीकांवर लादण्याचे काम हा करारनामा करणार आहे त्याच्यावर पुर्नविचार केला पाहिजे. JNNURM अंतर्गत आपण जे प्रोजेक्ट राबवितो त्या प्रकल्पाच्या संदर्भात आपण झोपडपट्टी पुनर्वसन, EWS,रस्त्याचे काम, पाणीपुरवठा संदर्भातील काम,जलनि:सारणचे काम यामध्ये डीपीआर कॉस्ट आणि प्रत्यक्षात ॲवॉर्डेड कॉस्ट पाहिलीतर से. २२ याठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प चाललेला आहे ॲवॉर्डेड कॉस्ट १४० कोटी आहे. दुस-या टप्प्या संदर्भात डीपीआर कॉस्ट ९१ कोटी आहेतर ॲवॉर्डेड कॉस्ट १४९ कोटी आहे. तीस-या टप्प्या संदर्भात डीपीआर कॉस्ट ३५ कोटी आहे तर ॲवॉर्डेड कॉस्ट ७१ कोटी आहे. झोपडपट्टी पुनर्वसनाची डीपीआर कॉस्ट ३५९ कोटी तर ॲवॉर्डेड कॉस्ट ६१० कोटी आहे. प्रचंड तफावत निर्माण झालेली आहे. आपल्याला डीपीआर कॉस्ट आहे त्याप्रमाणे केंद्रशासनाचा ५० टक्के निधी मिळणार आहे व राज्यशासनाचा २० टक्के मिळणार आहे आणि महापालिकेचा ३० टक्के असणार आहे आपल्या चुकिच्या नियोजनामुळे ही जबाबदारी ३० टक्क्याची आपल्यावर ६० ते ६५ टक्के वाढणार आहे. आपल्याला आज सुध्दा ठेकेदाराचे १०० कोटीचे देणे आहे त्यामुळे हे बजेट तूटीचे बजेट म्हणलेतर वावगे होणार नाही. हा अर्थसंकल्प प्रचंड करवाढ असलेला अर्थसंकल्प असे वर्णन करावे लागेल. करवाढीच्या माध्यमातून मिळणारे उत्पन्न तूम्ही ग्राहय धरलेले आहे. मिळकतकराच्या संदर्भात आपण राज्यशासनाला कर देतो. २००४-०५ ला एकूण उत्पन्न ३८ कोटी आहे त्यापैकी ११ कोटी शासनाला दिले आहेत सन २००५-०६ ला एकूण उत्पन्न ५५ कोटी पैकी १६ कोटी,सन २००६-०७ ला एकूण उत्पन्न ६० कोटी पैकी १८ कोटी, सन २००७-०८ ला एकूण उत्पन्न ७४ कोटी पैकी १९ कोटी, सन २००८-०९ ला एकूण उत्पन्न ८९ कोटी पैकी २४ कोटी शासनाला कराच्या रुपाने दिले आहेत सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात ९० कोटी पैकी २० कोटी आपण शासनाला दिलेले आहेत. ग्रामीणची २० टक्के जबाबदारी शासन उचलत नाही शासनाने ती जबाबदारी उचलली पाहिजे. पालकमंत्री मा.अजीत पवार हे मा.मुख्यमंत्र्याच्या जवळचे आहेत,शासनाचा निधी ते मिळवून देवू शकतात तसा प्रयत्न करावा. आर्थिक दुर्बल

घटकातील लोकांसाठी १३२५० घरे देणार आहेत. राज्याचा निधी आलातर ही योजना होऊ शकते, तरी तो निधी घेतला पाहिजे अशाप्रकारचा प्रयत्न केला पाहिजे. याठिकाणी वाढीव खर्चाचा विषय असेल, सल्लागारांवर झालेल्या खर्चाचा विषय असेल, थेट पध्दतीने झालेल्या १५० कोटीचा खर्च असेल, बजेट मॉनेटरींग नाही याची सुध्दा चौकशी झाली पाहिजे. JNNURM अंतर्गत कोटयावधीचे काम या शहरात झालेले आहे. महापालिकेचे हजार कोटीचे काम होते, दोन हजार कोटीचा खर्च होणार आहे शहरात हे प्रोजेक्ट होत असताना त्याचा दर्जा राखला गेला पाहिजे, त्याचे नियोजन झाले पाहिजे. योग्य नियोजन करायचे असेलतर, कामाचा चांगला दर्जा टिकविण्याकरिता चांगली कमिटि नेमून प्रत्येक कामाचे व्हेरीफिकेशन केले पाहिजे. महापौर साहेब, आपली सूचना असायची की आरोग्या वर जास्त खर्च द्या तो झालेला नाही. स्वाईन फ्ल्यूच्या संदर्भात व्हेंटीलेटर खरेदी केले आहेत ९ लाखाचे व्हेंटीलेटर २४ लाखात घेतलेले आहेत त्याची चौकशी झाली पाहिजे. ती रक्कम खरोखर इतकी नसेलतर ती वसुल केली पाहिजे हे तीन दिवस वर्तमानपत्रामध्ये येत होते. वायसीएम हॉस्पिटलच्या डॉक्टरांचा सावळागोंधळ, त्याठिकाणी होणारा भ्रष्टाचार,गैरव्यवहार ते भ्रष्टाचाराचे कुरण झाले आहे. त्याठिकाणी कठोर कार्यवाही केली पाहिजे. मंत्रालयाच्या दालनावर ५ कोटी आणि या सभागृहातील सभासदांच्या दालनावर साडेसात कोटी खर्च झालेला आहे. सन २००६ च्या बजेटवर बोलत असताना आम्ही सांगीतले आहे की महापालिका कर्जबाजारी होण्याच्या दृष्टिने पाऊल टाकते आहे मागच्या बजेटवर बोलत असताना दिवाळखोरीच्या दिशेने वाटचाल करते आहे असे वक्तव्य केलेले आहे. त्यादृष्टिने दिवाळखोरीची वाटचाल चालू आहे. बंद नळ योजनेच्या बाबतीत बोलत असताना ती झाली पाहिजे. ती करत असताना मावळ परिसरातील ज्या लोकांनी मदत केलेली आहे त्यांची व्यथा आहे ती दुर करण्याचे काम ख-या अर्थाने आपल्या हातात आहे व ते केले पाहिजे. सर्वजणांनी त्यांच्याकडे गेले पाहिजे. पाण्याचा प्रश्न बिकट आहे. आपण शहराच्या वेगवेगळया भागामध्ये वेगवेगळया कार्यक्रमाला जात असतो,आपल्या लक्षात येत असेल की या शहरात मोठया प्रमाणात इमारती होतात,मोठया प्रमाणात बांधकामे होतात,नागरीकरण वाढत आहे इमारतीला परवानगी देत असताना त्या नागरीकांना पायाभूत सुविधा किंवा पाण्याच्या सुविधा देणे आवश्यक आहे. महापालिकेवर आर्थिक भुर्दंड बसणार आहे तो सहन करत असताना आपल्याला भविष्याचे नियोजन करावे लागेल. पाणी वाढवावे लागेल. हे प्रकल्प अर्धवट अवस्थेमध्ये थांबलेले आहेत. अनेक प्रकल्प चुकिच्या नियोजनामुळे अर्धवट राहिलेले आहेत. नियोजन न करता प्रकल्प राबवायचे, वर्क ऑर्डर द्यायच्या त्यामुळे प्रकल्पाचा खर्च वाढतो व तो प्रकल्प अर्धवट रहातो, अशाप्रकारच्या गंभीर चुका आपण का करतो.

मा.दत्तात्रय साने :- मा.महापौर साहेब, कोरम नसल्यामुळे सभा बेकायदेशिर वाटते, सभा तहकूब करावी.

मा.महापौर :-  मारुती भापकर चर्चेचा शेवटचा दिवस आहे. सगळे मुद्दे झालेले आहेत,तुम्ही तूमचे मुद्दे संपवावेत. चर्चा करण्यासाठी आजचाच दिवस आहे. नंतर यावर चर्चा करता येणार नाही.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, शहराचे मोठया प्रमाणात नागरीकरण वाढते आहे पाण्याचे नियोजन केले पाहिजे. बंद नळ योजनेबाबत त्याठिकाणच्या शेतक-यांची व्यथा लक्षात घेतली पाहिजे.  आपण टिडीआर,एफएसआय मोठया प्रमाणात देतो. शहरात नागरीकरण वाढते आहे,आपण हे सर्व करत असताना आपल्याला ज्या पायाभूत सुविधा द्यायच्या आहेत त्याचा सुध्दा विचार केला पाहिजे. ज्या लोकांची घरे रस्ता रुंदीकरणामध्ये बाधित होणार आहेत त्यांच्या पुनर्वसनाच्या संदर्भात तरतूद केली पाहिजे. नवीन गावामध्ये मार्किंग केलेतर  लोक रस्त्यामध्ये जागा घेणार नाहीत,इमारत बांधणार नाहीत. रोप-वे सारखा प्रकल्प झाला पाहिजे. खेळाची मैदाने जी आहेत ती कमी आहेत, आपल्याकडे उद्याने प्रचंड आहेत व खेळाची मैदाने कमी आहेत त्यासंदर्भात विचार केला पाहिजे. या जागेचे भूसंपादन झाले पाहिजे. गुंठेवारीच्या संदर्भात सांगायचे झालेतर प्रकरणे पेन्डीग आहेत. पुन्हा गुंठेवारी सुरु करता आलीतर तसा प्रयत्न करावा. पार्किंगच्या संदर्भात पोलीसाना  अधिकार प्रदान करत असताना पार्किंगच्या जागा पहिल्यांदा ताब्यात घेतल्या पाहिजेत. लोकांना सवय लावली पाहिजे त्या अगोदर नागरीकांना भुर्दंड होणार नाही यादृष्टिने प्रयत्न केला पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्था ज्या आहेत त्यासंदर्भात,प्राधिकरण, एमआयडीसी यांच्यामध्ये समन्वय राहायला पाहिजे.  बजेटवर कुठल्याही सूचना घेणार नाहीत परंतु आम्ही ज्या भावना व्यक्त करतो त्याचा विचार करावा.  आता नाहीतर पुढच्यावेळेस तरी त्याचा अंतर्भाव करावा. ज्या सूचना केलेल्या आहेत त्याचा विचार भविष्यकाळात करावा.

मा.आयुक्त :- मा.महापौर साहेब, बजेटवर बोलत असताना वेगवेगळया सूचना आलेल्या आहेत सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे. मंगलाताई कदम यांनी मागच्या वेळेस मुद्दे मांडले होते त्याच्यानंतर आज मुद्दे मांडलेले आहेत. एक्झिस्टींग बजेटवर करु शकतो. आर.एस.कुमार यांनी वॉर्डस्तरीय कामाबद्यल सांगीतले. सन २००९-१० मध्ये ५२ कोटीच्या वर्कऑर्डर दिलेल्या आहेत आणि २०१०-११ मध्ये २०० कोटीच्या वर्कऑर्डर देणार आहोत. चार पटिने वाढ झालेली आहे. जुने पेन्डींग बील आहेत ते वगळून २०० कोटी वॉर्डाच्या कामासाठी तरतूद केलेली आहे. २८४ कोटीचे बजेट प्रभागामधुन मंजूर होवून आलेले आहे त्याठिकाणी चर्चा झालेली आहे अशी आमची अपेक्षा होती.  फायनल बजेट तेथून येणार आहे आणि तेच बजेट स्थायी समितीला येईल असे होते. सन २०११-१२ मध्ये JNNURM चे प्रोजेक्ट संपणार आहेत त्यासाठी तरतूद केलेली आहे. वॉर्डस्तरीय कामामध्ये जास्तीत जास्त पैसे दिले पाहिजेत, विशेष निधीमधुन अजीबात घेतलेले नाहीत. सदस्यांनी नवीन रेव्हेन्यू सोर्सचे मुद्दे मांडलेले आहेत ते इन्क्रीज

करण्यासाठी योजना आणलेल्या आहेत. अर्बन ट्रान्सपोर्ट फंड आणलेला आहे त्यासाठी शासनाकडून परमिशन मिळालेली नव्हती ती आता मिळालेली आहे. त्यामुळे ९० कोटी उत्पन्न मिळू शकेल. प्रॉपर्टि टॅक्समधुन उत्पन्न मिळालेले आहे. पुर्वी ॲडव्हरटाइज यातुन ३ कोटी उत्पन्न मिळत होते आता ऑक्शन पध्दतीने देणार आहोत त्यामध्ये ५ कोटी वाढ आहे. ज्या ज्या ठिकाणी खर्च वाचविता येईल, उदा. भुयारीमार्ग बीगबाझार याठिकाणी केलेला आहे तसे करता येईल आम्ही ज्या ठिकाणी पैसे खर्च करतो ते वाचविता येतील. पाणीपुरवठयावर जेवढा खर्च करतो तेवढे पैसे वसुल झाले पाहिजेत असा उद्देश आहे. मीटर पध्दत लागू केली आहे रेव्हेन्यू थोडा कमी मिळणार आहे परंतू पुढील एक-दोन वर्षात त्याचा फायदा मिळेल

मा.महापौर :- सर्वानी व्यवस्थीतरित्या मुद्दे मांडलेले आहेत. सन्मा.सदस्यांनी त्यांचे अनुभव, असलेल्या त्रुटि आणि भविष्यामधील सुचना केलेल्या आहेत त्यामध्ये मीही आपल्या सर्वांच्या वतीने सांगतो की आपण काहीतरी नवीन उत्पन्नाचे स्त्रोत्र सुरु केले पाहिजे त्या अनुषंगाने एक कमिटि स्थापन करुन त्यात ज्येष्ठ नगरसेवक अर्थतज्ञ घ्यावेत घरपट्टी,पाणीपट्टी या व्यतिरीक्त उत्पन्न कसे वाढविता येईल हे ती कमिटि पाहिल. त्यामध्ये यशवंत भोसले, भाई सोनवणे,आझमभाई पानसरे,मंगलाताई कदम,भाऊसाहेब भोईर आणि इतर सदस्य तसेच बाहेरचे अर्थतज्ञ आणि आपले अधिकारी यांची कमिटि करुयात. वर्षभरामध्ये कमिटिच्या चार-पाच मिटिंग होतील त्या अनुषंगाने आपले उत्पन्न वाढेल. फायरस्टेशनच्या बाबत १० कि.मी.पर्यंतची जबाबदारी शासनाने दिलेली आहे. आपल्याकडे फायर ब्रिगेडची कमतरता आहे, अग्निशमन स्टेशन वाढविले पाहिजेत, ती यंत्रणा सक्षम करणे आवयक आहे. ग्लोबल वॉर्मिंग लक्षात घेवून या परिसरातील बिल्डर्स आहेत त्यांना इको हौसींगचा पेड एफएसआय पेड टीडीआर कसा देता येईल आणि उत्पन्न कसे वाढविता येईल हे बघावे इको हौसिंग बदल कसा करता येईल, सोलर सिस्टीम,वॉटर हार्वेस्टींग कसे करता येईल हे रुलमध्ये बदल करुन करणे काळाची गरज आहे. महिलांसाठी राज्यशासन, केंद्रशासनाचे धोरण आहे ५० टक्के रिझर्व्हेशन आहे. महिलांचे टॉयलेट,त्यांचे प्रशिक्षण हे होणे आवश्यक आहे. लॅण्ड ॲक्वीझेशनचा विषय आहे त्याचा उल्लेख केलेला आहे रोडमार्किंग करावी, ग्रामीण भागाच्या टॅक्सवर निर्णय घेणे आवश्यक आहे मंदीच्या काळात मुंढे साहेबांनी आणि जकातीच्या लोकांनी अतीशय चांगले सहकार्य केलेले आहे त्यांचे अभिनंदन करतो. जकात विभागामध्ये स्टाफला संरक्षण दयावे. अधिका-यांना धक्का लागणार नाही हे बघावे व जकात चोरीला आळा घालावा पवना नदी दुषित होते त्याबद्यल सूचना केलेली आहे, त्याकडे बारकाईने लक्ष दयावे लागेल, पाण्याची व्यवस्था महत्वाची आहे. पेड एफएसआय,पेड टिडीआर हा कन्सेप्ट आणून महापालिकेचे उत्पन्न कसे वाढविता येईल हे बघावे.

मा.आर.एस.कुमार :-   मा.महापौर साहेब, आयुक्तांनी सांगीतले २०० कोटी प्रभागाला दिलेले आहेत, चार प्रभाग आहेत एका प्रभागाला ५० कोटी येतात त्यातच थकबाकी बिल आले हा सर्व विचार केलातर अ प्रभागात २७ वॉर्ड आहेत २५ कोटी राहणार आहेत. पेन्डींग बिल आपण लक्षात घेत नाहीत. थकबाकी बिल यातून मायनस करत नाहीत.  २५ कोटीमध्ये २७ वॉर्डाचे डांबरीकरण, फुटपाथ,गटारचे काम होणार नाही त्यामुळे बजेटमध्ये वेगळा विचार करावा. पॉझीटिव्ह विचार करावा. महापौर साहेब, आपण आणि आयुक्तांनी विचार करुन प्रभागाला रक्कम वाढवून द्यावी.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, महाराष्ट्रातील आपली पहिलीच महापालिका आहे की तीने ऑनलाईन बजेट केलेले आहे. सगळयांना पुर्वीसारख्या कॉपी द्यायची गरज नाही. ऑनलाईन बजेट करणारी ही आपली पहिलीच महापालिका आहे. मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८२७ विषय क्रमांक :- १
दिनांक :- २०.३.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.लेखा/६/कावि/२८१/१० दि.२०/२/१०
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.१०७४९ दि.२८.०२.२०१०

मा.आयुक्तांकडून आलेले संदर्भ क्र.१ नुसारचे पुढीलप्रमाणेचे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे स्थायी समितीचे सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रक अ व क तसेच जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत महापालिकेने नमुद केलेल्या प्रशासकीय सुधारणांचा विचार करून शहरी गरीबांसाठीचे “प” अंदाजपत्रक त्याचप्रमाणे जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत प्रकल्पांसाठी प्राप्त शासन अनुदान व मनपा हिस्सा याबाबतचे अंदाजपत्रक कामीचे अंदाज/प्रस्ताव अवलोकन करणेत आले.

अंदाजपत्रक “अ”,“क”,“प ” व जेएनएनयुआरएम अंदाजपत्रक

| अ.क्र. | तपशिल | सन २००९-१० चा सुधारित अंदाज र.रु. | सन २०१०-११ चा अंदाज र.रु. |
|---|---|---|---|
| अ) १) | एकूण जमा | ११८३,७०,७८,३७५ | ११८४,७६,२७,३७५ |
| २) | एकूण खर्च | ११८३,१८,९३,००० | ११८४,५७,८१,३०० |
| ३) | अखेरची शिल्लक | ५१,८५,३७५ | १८,४६,०७५ |
| ब) १) | भाग-३ एकूण जमा | ३०६,९७,५५,८३५ | २१३,०९,०३,८३५ |
| २) | भाग-३ एकूण खर्च | ३०६,९७,५५,८३५ | २१३,०९,०३,८३५ |
| क) | | ८५०,११,६६,००० | ११९२,८९,०४,००० |

| | | | |
|---|---|---|---|
| १) | जेएनएनयूआरएम एकूण जमा | | |
| २) | जेएनएनयूआरएम एकूण खर्च | ७००,९३,९९,७२८ | ११५३,९०,००,००० |
| ३) | अखेरची शिल्लक | १४९,१७,६६,२७२ | ३८,९९,०४,००० |

वरीलप्रमाणे मा.आयुक्त यांजकडुन आलेले अंदाज विचारात घेवुन पुढीलप्रमाणे कमी अधिक करण्यात आले आहे.

सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रक

| | | |
|---|---|---|
| पान क्र.२६४ अ.क्र.१ | थेरगाव वॉर्ड क्र.८३ मध्ये स.नं.९ भागात सांस्कृतीक इमारत बांधणे | र.रु.२०,००,००० अधिक |
| पान क्र.२४५ अ.क्र.१७ | थेरगाव वॉर्ड क्र.८३ मध्ये ड्रायव्हर कॉलनी व इतर परिसरात इंटरलॉकींग ब्लॉक बसविणे | र.रु.१०,००,००० कमी |
| पान क्र.२५३ अ.क्र.२ | थेरगाव वॉर्ड क्र.८३ मध्ये एकता कॉलनी,समता कॉलनी व इतर परिसरात डांबरीकरण करणे. | र.रु.१०,००,००० कमी |
| पान क्र.२१ अ.क्र.८(४) | प्र.क्र.११ सांगवी येथील मुळा नदीकाठी स्पायसर ब्रीज ते राजीव गांधी ब्रीजपर्यंत तटरक्षक भिंत बांधणे | र.रु.२३,००,००० अधिक |
| पान क्र.२२० अ.क्र.३ | वॉर्ड क्र.९३ सांगवी मधुबन सोसायटी व इतर भागामध्ये पावसाळी पाण्यासाठी गटर्स करणे | र.रु.५,००,००० कमी |
| पान क्र.२२८ अ.क्र.१३ | वॉर्ड क्र.९३ सांगवी मधुबन सोसायटी व इतर परिसरातील रस्त्यांवरील चर डब्ल्यू बी एम व बी बी एम पद्धतीने बुजविणे | र.रु.४,००,००० कमी |
| पान क्र.२३१ अ.क्र.५ | वॉर्ड क्र.९३ गंगानगर व भागातील रस्त्यावरील चर बुजविणे | र.रु.३,००,००० कमी |
| पान क्र.२३७ अ.क्र.२३ | वॉर्ड क्र.९३ सांगवी ममतानगर भागात डांबरीकरण करणे. | र.रु.४,००,००० कमी |

| | | |
|---|---|---|
| पान क्र.२७६ अ.क्र.१७१ | प्रभाग क्र.९३ सांगवी विविध विभागामार्फत खोदण्यात आलेल्या सेवा वाहिन्याच्या चरांची खडीमुरुम व बी बी एम पद्धतीने डांबरीकरण करणे. | र.रु.२,००,००० कमी |
| पान क्र.२८१ अ.क्र.१५ | वॉर्ड क्र.९३ गंगानगर व भागात स्थापत्यविषयक कामे करणे. | र.रु.५,००,००० कमी |

वरीलप्रमाणे मा.आयुक्त यांचे सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रकात खर्च बाजुचे अंदाजात र.रु.४३,००,००० अधिक व र.रु.४३,००,००० कमी करणेत आले आहेत.

त्यानुसार मा.स्थायी समितीचे सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रक “अ” व “क” तसेच जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत महापालिकेने नमुद केलेल्या प्रशासकीय सुधारणांचा विचार करून शहरी गरीबांसाठीचे “प” अंदाजपत्रक त्याचप्रमाणे जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत प्रकल्पांसाठी प्राप्त शासन अनुदान व मनपा हिस्सा याबाबतचे अंदाजपत्रक पुढीलप्रमाणे तयार करणेत आले आहे ते अंतिमरित्या स्विकृत करणेत येत आहे.

<u>अंदाजपत्रक “अ”,“क”,“प ” व जेएनएनयुआरएम अंदाजपत्रक</u>

| अ.क्र. | तपशिल | सन २००९-१० चा सुधारित अंदाज र.रु. | सन २०१०-११ चा अंदाज र.रु. |
|---|---|---|---|
| अ) १) | एकूण जमा | ११८३,७०,७८,३७५ | ११८४,७६,२७,३७५ |
| २) | एकूण खर्च | ११८३,१८,९३,००० | ११८४,५७,८१,३०० |
| ३) | अखेरची शिल्लक | ५१,८५,३७५ | १८,४६,०७५ |
| ब) १) | भाग-३ एकूण जमा | ३०६,९७,५५,८३५ | २१३,०९,०३,८३५ |
| २) | भाग-३ एकूण खर्च | ३०६,९७,५५,८३५ | २१३,०९,०३,८३५ |
| क) १) | जेएनएनयूआरएम एकूण जमा | ८५०,११,६६,००० | ११९२,८९,०४,००० |
| २) | जेएनएनयूआरएम एकूण खर्च | ७००,९३,९९,७२८ | ११५३,९०,००,००० |
| ३) | अखेरची शिल्लक | १४९,१७,६६,२७२ | ३८,९९,०४,००० |

मा.विनायक रणसूभे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ६०                                        प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----------

मा.महापौर :- सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर करणेत येत आहे.

(बहल योगेश मंगलसेन)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/ ४५३ /२०१०
दिनांक :- ३ / ०४ /२०१०

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.